प्रकरण दुसरे

# दलित कादंबरीचे स्वरुप


२.१) प्रास्ताविक

१) कादंबरीचे स्वरूप

२) दलित संकल्पना

३) दलित साहित्य : प्रेरणा व स्वरुप

४) दलित कादंबरी

२.२) दलित कादंबरीचे निराळेपण

१) कथानक

२) व्यक्ती व समाज यांचे चित्रण

३) वातावरणनिर्मिती

४) पुराणकथांचा वेगळ्या दृष्टींने वापर

५) भाषा, रुढी, संकेतांना धक्के

६) रुपक, प्रतीक, प्रतिमांचा समर्थपणे वापर

२.३) दलित कादंबरीचे निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ

प्रकरण दुसरे

# दलित कादंबरीचे स्वरुप

## २.१ प्रास्ताविक :

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असल्यामुळे माणसाचा एकूण जीवनप्रवास जन्मल्यापासून मरेपर्यंत समाजात होत असतो. ज्याप्रमाणे माणसाचे सर्व आयुष्य समाजसापेक्ष असते, त्याचप्रमाणे साहित्याचे स्वरुपही समाज सापेक्षच असते. प्रत्येक साहित्याची निर्मिती समाजातच होत असते आणि ते साहित्य निर्माण करणारा साहित्यिकही त्या समाजाचाच घटक असतो. साहित्य, साहित्यिक, साहित्यप्रकार आणि समाज यांचा निकटचा संबंध असून साहित्य हेच समाजाला वळण लावत असते. साहित्यातूनच साहित्यिकाची सामाजिक बांधिलकी व्यक्त होत असते. या बांधिलकीतूनच साहित्यिक समाजाच्या आजच्या स्थितीचे वर्णन करत असतो. समाजाच्या स्थितीगतीचा परिणाम साहित्यावर होत असून त्यानुसार साहित्याची निर्मिती होत असते. त्यामुळे समाजही साहित्याकडून मनोरंजनाची, उद्‌बोधनाची, सामाजिक ऐक्य टिकविण्याची व बंधुभावाची अपेक्षा करतो.

साहित्यातूनच कथा, काव्य, नाटक, कादंबरी, आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांचा उदय होतो. या वाङ्मयप्रकारांपैकी 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार व्यापक जीवनानुभूतीची अभिव्यक्ती आणि वास्तव जीवनाशी असणारे नाते आहे. म्हणूनच मानवी जीवनातील मोठ्या जीवनपटांच्या अनुभवांचे चित्रण करणारा कादंबरी हा एक वाङ्मयप्रकार आहे.

### १) कादंबरीचे स्वरूप :

स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषत: १९६० नंतर मराठी कादंबरीचा अभूतपूर्व विस्तार झालेला आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार इंग्रजी साहित्यात जन्माला आला असून हा अत्यंत मनोरंजक असा एक आधुनिक वाङ्मयप्रकार आहे. मराठीतील 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराला इंग्रजीत 'नॉव्हेल' हा प्रतिशब्द वापरला जातो. 'नॉव्हेल' या इंग्रजी शब्दापासून मराठीत 'कादंबरी' हा शब्द आलेला आढळतो. कादंबरीच्या स्वरूपाचा विचार करताना

'कादंबरी' या शब्दाचा अर्थ पाहणे गरजेचे आहे. संस्कृतमधील बाणभट्टाच्या 'कादंबरी' या संस्कृत कथात्मक ग्रंथाच्या नामावरून 'कादंबरी' हा शब्द रुढ झालेला आहे.

कादंबरी वाङ्मय प्रकारातला जीवनपट फार मोठा असल्याने जीवनाचे सर्व चित्रण त्यात दाखवता येते. कादंबरी या वाङ्मयाच्या सहाय्याने मानव आपली सारी सुखदु:खे व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. मानवी जीवनाचा विशाल पट उभा करण्याचे सामर्थ्य या साहित्य प्रकारात आहे. कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केलेला आहे. विशाल अशा मानवी जीवनाच चित्रण करणाऱ्या कादंबरीचे स्वरुप गुंतागुंतीचे असल्याने तिला व्याख्येत बांधणे कठीण आहे. कादंबरीची संकल्पना काळानुसार बदलताना दिसते. त्यामुळे कादंबरीची नेमकी व्याख्या करणे कठीण झाले आहे. तरीही कादंबरीच्या स्वरुपावर प्रकाश टाकणाऱ्या मोजक्या व्याख्यांचा विचार करणे गरजेचे आहे.

'सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्‌वलंबित जिवित घटना यांचे गोष्टीरुपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जिवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग म्हणजे कादंबरी.[१] अशी प्रा. बापट, गोडबोले यांनी व्याख्या केली आहे. या व्याख्येवरून ध्यानात येते की लेखक वास्तवातील घटना कल्पकतेच्या कथास्वरुपात सांगून त्याआधारे मानवी जीवनातील विविध समस्या उकलण्याचा प्रयत्न करतात. उषा हस्तक कादंबरीची पुढील व्याख्या करतात, 'लघुकथा आणि लघुकादंबरी ह्यांच्यापेक्षा कादंबरीला मानवी जीवनव्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरुपात घडविता येते. कारण तिचा पट त्यांच्याहूनही अधिक विस्तृत असतो. घटना, व्यक्ती, वातावरण इत्यादी घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाचा विविध स्तरीय व्यामिश्र स्वरुपाचे दर्शन तिला घडविता येते. त्यासाठी सामान्यत: स्थळकाळाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो.[२] म्हणजेच मानवी जीवनातील गुंतागुंत मोठ्या कालखंडातील घटना, प्रसंगाच्या

आधाराने लेखक दाखवितो. मुख्य कथानकाच्या जोडीने उपकथानके घेऊन एक मोठा जीवनपट उलगडलेला असतो. हे वरील व्याख्यांवरून ध्यानात येते.

कादंबरीची सर्वसमावेशक आणि नेमकी अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केला आहे. 'कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग हे अपूर्णतेपेक्षा संपुर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरीच्या सर्व समावेशक गोष्टींमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. एखाद्या समस्येचा पाठपुरावा विविध संदर्भांसकट मांडलेला असतो .[३]

वरील सर्व व्याख्यांचे विवेचन केल्यानंतर 'कादंबरी' या वाङ्मयाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) कादंबरी या वाङ्मयप्रकाराकडे कालमानानुसार पाहण्याची दृष्टी बदलत असल्यामुळे कादंबरीची नेमकी व्याख्या करणे जड जाते.

२) कादंबरी हे कथात्म गद्याचे विस्तृत रुप आहे.

३) कादंबरीत जीवनाचे चित्रण, सत्याभास वास्तवपूर्ण ठरेल अशा रितीने केलेले असते.

४) कादंबरी या वाङ्मयप्रकारात कथानकाला व निवेदनाला महत्व असते.

५) कादंबरीचा आशय तिच्या विस्ताराची मर्यादा निश्चित करतो.

जीवनातील सत्यदर्शन घटना, व्यक्ती व वातावरण इत्यादी घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविधस्तरीय स्वरुपाचे दर्शन कादंबरीतून घडविता येते. म्हणजेच कादंबरी हा विस्तृत भाषिक अवकाश असलेला वाङ्मयप्रकार आहे.

### २) दलित संकल्पना :

भारतीय समाजव्यवस्थेने दलितांना दास्यात, गुलामगिरीत ठेवणाऱ्या रुढी, परंपरा, धर्मशास्त्रे यांना नकार देणाऱ्या क्रांतिकारक विचारा बरोबरच समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय अशा श्रेष्ठ मूल्यांवर आधारलेला नवसमाज निर्माण करण्याचा मूलगामी विचारही डॉ. आंबेडकरांनी दलितांना दिला. त्यांच्या या मूल्यामुळेच क्रांतिकारी विचारांतून व त्यांच्या विद्रोही बंडखोरीच्या जीवनकृतीतून दलित साहित्याचा जन्म झाला. त्यामुळे दलित साहित्याच्या परिघात प्रामुख्याने पीडीत, शोषित, अवमानित, उद्ध्वस्त, अशा व्यक्तींच्या व्यक्तिसमूहाला संपूर्ण समाजाच्या संदर्भात 'दलित' हे विशेषण वापरले जाते. दलितत्वाचा उगमच मुख्यत: येथील समाजरचनेतील जातीव्यवस्थेतच आहे. या व्यवस्थेमुळे व्यक्ती जन्माबरोबरच दलितत्व घेऊन येते आणि ते मृत्यूपर्यंत, किंबहुना अंतिम संस्कारापर्यंत टिकून राहते. दलितत्वच व्यक्तीच्या व्यक्तिसमूहाच्या सामाजिक स्थानाची आर्थिक व राजकीय कृतींची निश्चिती करते. 'दलित' या शब्दात सर्व प्रकारचे शोषण अभिप्रेत आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी १९१९ मध्ये साऊथ ब्यूरो कमिशनपुढे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची कैफियत मांडून आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरवात केली. १९२० मध्ये अस्पृश्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. पुढे 'मूकनायक' बंद पडल्यानंतर १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारणी सभा' स्थापन करून त्यांनी ३ एप्रिल १९२७ पासून 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रीय लेखनातूनच 'दलित' या शब्दाचा वापर झाल्याने 'दलित साहित्य संकल्पना' त्यातूनच उदयास आलेली जाणवते. 'सामान्यत:' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्टार्ट कमिटी, सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदेला सादर केलेली निवेदने, तसेच दिलेल्या साक्षी यामध्ये डिप्रेस्ड, अनटचेबल, शूद्र या शब्दांना जसे पर्यायी म्हणून बहिष्कृत, अस्पृश्य, निराश्रित इत्यादी शब्द वापरले आहेत. त्यातूनच 'दलित' हा शब्द उदयास आला आहे, हे ऐतिहासिक आढाव्याच्या आधारे सिद्ध करता येते.

डॉ. कृष्णा किरवले दलित संकल्पनेविषयी खालील भाष्य करतात की, ''डॉ. आंबेडकर यांची संपूर्ण तात्विक बैठक आणि तत्वज्ञानाच्या केंद्रस्थानी 'ब्रोकनमेन' सिद्धान्ताला अनन्यसाधारण महत्व आहे. हा सिद्धांत बाजूला सारून आंबेडकरांच्या तत्वज्ञानाची मांडणी करणे शक्य होणार नाही. 'ब्रोकनमेन थिअरी' तील Broken या शब्दाचे इंग्रजी शब्दकोशातील अर्थ Smashed, shattered, cracked, tractured,, separcted, destoryed, demolished असे आहेत. त्याचे मराठी भाषेतील अर्थ चिरडणे, भरडणे, कुटणे, तोडणे, फोडणे, जबरदस्ती करणे असे आहेत. मराठीमध्ये रुढ असलेल्या 'दलित' या शब्दाचे अर्थ आणि डॉ. आंबेडकर प्रतिपादित 'ब्रोकनमेन' थेअरीचा अर्थ समान पातळीवर जाणारे आहेत. तात्पर्य असे की, 'दलित' हा शब्द नाकारण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच डॉ. आंबेडकरांची ब्रोकनमन थिअरी नाकारणे होय. त्यामुळे Depressed म्हणजे निराश्रित किंवा बहिष्कृत या शब्दाऐवजी Despised हा शब्द सुचविण्यामागचा डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन समजून घेणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे स्टार्ट कमिटी आणि सायमन कमिशनला दिलेले अहवाल व दिलेल्या साक्षीनंतरच डॉ. आंबेडकर संपादित 'बहिष्कृत भारतातून' या अंकात दलित हा शब्द उपयोगात येताना दिसतो. बहिष्कृत भारतात पुढीलप्रमाणे दलित हा शब्द वापरला गेला आहे.

श्री. सु.गो. टिपणीस, प्रेसिडेंट, म्युनिसिपालिटी, महाड यांचे दि. १० मे १९२७ रोजी पाठविलेले पत्र 'बहिष्कृत भारतच्या' २० मे १९२७ च्या अंकात छापले आहे. महाड सत्याग्रहाच्या वेळी सत्याग्रहींना जी मारहाण झाली त्यासंदर्भात 'माझ्या दलित बांधवांना मारहाण झाली, त्यावेळी त्यांना कोणतीही मदत करता आली नाही. अशी खंत व्यक्त केली आहे. दि. १६ नोव्हेंबर १९२८ च्या अंकात 'दलित अस्पृश्य वर्ग' 'दलितावस्थेत, 'दलितवर्ग, 'दलित वर्गात जागृती' हे शब्द हिंदी स्वातंत्र्य संघाच्या बंगाल व महाराष्ट्राच्या दोन शाखांच्या जाहीरनाम्यावर भाष्य करताना वापरले आहेत.[४]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तात्पर्य हे की डॉ. आंबेडकरांनी १९२८ साली Depressed classes ह्या शब्दाऐवजी Desoused castes हा शब्द अस्पृश्यांसाठी उपयोगात आणला. ज्याचा सरळ सरळ अर्थ दबलेला, कुटलेला, तुडवलेला, भरडलेला असा होता. त्याचे मराठी रुपांतर 'दलित' या नावाने 'क्रियाशील' या शब्दाला 'बहिष्कृत भारताच्या' अंकातून स्थान मिळत गेले व पुढे या 'दलित' शब्दाला केंद्रवर्ती कल्पून अनेक संस्था, वृत्तपत्रे आणि राजकीय संघटना अस्तित्वात आल्या. दलित या संज्ञेत जो पारंपरिक अर्थ होता, तो दलितांचा स्वाभिमान दुखावणारा होता. दलित साहित्याच्या प्रवर्तकांनी 'दलित' या शब्दाला एक नवी अर्थवत्ता प्राप्त करून दिली. समाज व्यवस्थेकडून भरडला गेलेला असा दुर्लक्षित लोकसमूह म्हणून दलितांचा दर्जा होता.''[५] दलित साहित्याच्या विचारवंतांनी या शब्दात क्रांतिकारक आशय भरला आणि या वेगळ्या आशयमूल्य असलेल्या दलित या शब्दाला प्रतिष्ठा प्राप्त झाली.

दलित या शब्दासंबंधीच्या अभ्यासकांच्या व्याख्यांआधारे 'दलित' या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट होतो.

* **बाबुराव बागूल :**

बागूल यांच्या मते ''कलासाहित्याकडे बघण्याचा आणि ते निर्माण करण्याचा तो एक दृष्टिकोन आहे. हा दृष्टिकोन कोणीही स्विकारू शकतो. त्याला जातीचे, आर्थिक स्थितीचे प्रमाणपत्र लागत नाही..... माणसाचे महात्म्य, मुक्ती आणि माणूस म्हणून असलेली त्याची महान प्रतिष्ठा त्याला प्राप्त करुन देण्यासाठी जे लढत राहते, ते म्हणजे दलितत्व, म्हणजेच सम्यक क्रांतीत्व.''[६]

* **अर्जुन डांगळे :**

यांच्या मते दलित म्हणजे दलित ही एक जात नसून ती एक जाणीव आहे. दलित या संज्ञेला पारंपरिक अर्थ चिकटविला जातो आणि त्या अर्थातून लाचारी, दारिद्रय असे अनेक पदर सूचित केले जातात. दलित म्हणजे शोषित पिडित असा समाज धर्माच्या नावाखाली व अन्य कारणांनी ज्याचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शोषण केले जाते, तो माणूस.[७]

*  **यशवंत मनोहर :**

यशवंत मनोहर यांच्या मते दलित म्हणजे क्रांतिमान जाणीव, दलित म्हणजे परिवर्तननिष्ठ जीवनमार्ग, दलित विचार म्हणजे समता, संधीस्वातंत्र्याचा विचार, दलित म्हणजे पुरोगामी शक्तींना कवटाळणारे तत्वज्ञान, दलित म्हणजे सुसंस्कृत, शोषित व निरोगी मानवी जीवनाचे संकलन.[८]

*  **म.ना. वानखेडे**

वानखेडे यांनी १९७६ मध्ये नागपूर येथे भरलेल्या दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून दलित या संकल्पनेविषयी म्हटले होते की, दलित साहित्याच्या चर्चेतून एक प्रश्न उद्भवत आहे व तो म्हणजे दलित हा कोण आहे ? दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयांपुरती नाही, तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत, ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात. श्री. वानखेडे यांनी व्यक्त केलेल्या 'दलित' या संकल्पनेचा विचार करता समाजातील सर्वच पिळलेल्या, उपेक्षित ठरलेल्या लोकांचा समावेश केलेला आहे. जातीचा निकष न लावता सामाजिकतेच्या अंगातून हा विचार व्यक्त होताना दिसतो.[९]

*  **प्रभाकर मांडे :**

'दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह की ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावला गेला आहे. ज्यांच्या जन्माने त्यांच्या वाट्याला या समाजरचनेत एकाच प्रकारचे जीवन आले आहे. माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरिले गेले आहे, ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले आहे ते दलित'. [१०]

* **दत्ता भगत :**

भगत यांच्या मते दलित असा शब्द वापरण्याऐवजी पददलित हा शब्द योग्य आहे. हा शब्द वापरण्यामागे दत्ता भगतांचा वेगळा हेतू आहे, कारण ''पददलित म्हणजे पायांचा दास होय.'' [११]

* **नामदेव ढसाळ :**

ढसाळ यांच्या मते, दलित म्हणजे अनुसूचित जाती - जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी, इत्यादी. नामदेव ढसाळ या आपल्या व्याख्येत जाती – जमातींबरोबरच बौद्ध कष्टकरी यांचा समावेश दलितांमध्ये करतात. [१२]

केशवमेश्राम म्हणतात..... ''पिडित, शोषित, समाजाने नाकारलेला, ज्ञान, मान, सत्ता, संस्कृती आणि शास्तेपण यापासून सतत जाणीवपूर्वक दूर ठेवला गेलेला तो दलित.''[१३]

* **योगेंद्र मेश्राम :**

मेश्राम यांच्या मते माणसाला लढाऊपणाचे तेजु विद्रोहाची ताकदु माणुसकीने व जीवन सुंदरपणे जगण्याची इच्छा, प्रेरणा देणारा, क्रांतीचे स्फुरण ठरलेला 'दलित' हा शब्द वाच्यार्थाने प्रतीत होणारा नुसताच वायफळ शब्द नसून त्याला शेकडो वर्षांचा जिवंत इतिहास आहे. त्या शब्दामागे संपूर्ण असे एक सामाजिक जीवन उभे आहे. त्याला त्या जीवनाच्या उत्क्रांतीचा मूल्यगर्भ व गर्द संदर्भ आहे. परिवर्तनाच्या प्रेरणाशक्तीचा पेटता गंध माखलेला आहे. केवळ शब्दांनीच घरे, दारे, देश आणि माणसेसुद्धा पेटतात आणि विझतात, आजही शब्दात अशी शक्ती असते. 'दलित' या शब्दात त्या शक्तीचा वेगळा मूलस्रोतच भरलेला आहे.

वर्षानुवर्षे पिचत पडलेला 'दलित' हा सामाजिकता व सांस्कृतिकपणाला मुकला गेला, त्यामुळेच तो दुबळा बनला. 'दलित' हा शब्द विशिष्ट जातीपुरता मर्यादित न राहता, न ठेवता त्याला विस्तृत स्वरूप देण्याचा प्रयत्न साहित्यिकांनी केला आहे. [१४]

### * वसंत पळशीकर :

पळशीकर यांच्या मते 'दलितांमध्ये महार व नवबौद्ध आहेत, तसे इतर पूर्वास्पृश्य जातीचे लोकही आहेत. इतकेच नाही, तर भटके आदिवासी व सवर्ण जातीचे गरीब लोकपण त्यांत समाविष्ट होतात. [१५]

### दलित साहित्य निर्मिती : प्रेरणा व स्वरूप :

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक जोमदार प्रवाह उदयाला आला. दलित साहित्याची प्रेरणा म्हणून महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहिले जाते, तर काहीजण दलित साहित्याचा उगम बुद्धकाळात शोधताना दिसतात. महात्मा फुलेंनी मानवमुक्तीचा विचार मांडला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित जीवन सुधारण्यासाठी दलितांमधील लाचारी व न्यूनगंड घालवून त्यांच्यामध्ये आत्मशक्ती आणि आत्मविश्वास निर्माण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत:च अस्पृश्य समाजात जन्माला आलेले असल्याने अस्पृश्य समाजाला सहन कराव्या लागणाऱ्या दाहक अनुभवांचे चटके त्यांना सहन करावे लागले होते, त्यामुळे आपण जे भोगले, ते आपल्या बांधवांनी भोगू नये अशी त्यांची भावना होती. म्हणून 'बहिष्कृत भारत' च्या अग्रलेखात म्हणतात, ''दलितांचा उद्धार जसे सवर्ण भारतीय करणार नाहीत, तसे इंग्रजही करू शकणार नाहीत. यासाठी अस्पृश्यांनी स्वकल्याणाचे काम परक्यांवर सोपविण्याऐवजी स्वत:च्याच हाती घेणे बरे.'' यावर बाबासाहेब भर देतात. या भाष्यावरूनच ते दलितांमध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटविण्याचे कार्य अधिक जोमाने करताना दिसून येतात. आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच क्रांतिमय होते. दलितांच्या अभ्युदयासाठी त्यांनी आपले जीवन अर्पण केल्यामुळे दलितांचे प्रेम व विश्वास संपादन करतात. म्हणूनच विलायतेहून पाठवलेल्या पत्रात ते लिहितात.

'माझ्या जनतेच्या उद्धाराचे एक साधन व निमित्त म्हणून परमेश्वराने मला आज हाताशी धरले आहे. या दृढ जाणीवेने मला प्राप्त होणारे समाधान इतके दुर्मिळ आहे की, ते फारच थोड्या भाग्यवंतांच्या वाट्याला येत असेल. पूर्वसंकेतानुसार मजवर पडलेल्या या जबाबदारीला व माझ्या लोकांच्या मजविषयीच्या प्रेम व विश्वासाला स्वत:ला सर्वतोपरी पात्र बनवावे, हे मला माझे आद्य कर्तव्य वाटत आहे.[१६]

मूकनायक ते महानिर्वाण हा १९२० ते १९५६ पर्यंतचा काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणी, वाणी आणि कार्याने भारावला होता. बाबासाहेबांनी अस्पृश्यांची कैफियत गावकुसापासून ते गोलमेज परिषदांपर्यंत मांडली. अस्पृश्यांच्या समान हक्कांसाठी तळ्याच्या पाण्यापासून ते देवळातील परमेश्वरापर्यंत संघर्ष केला. बाबासाहेबांच्या या कार्यामुळे संपूर्ण दलित समाज प्रभावित झाला. दलितांवरील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी विद्रोहाचा प्रथम शब्द उच्चारला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच शूद्र, अतिशूद्र यांच्या संदर्भात 'दलित' 'बहिष्कृत' हे शब्द त्यांनी वापरले. दलितांच्या उद्धाराला त्यांनी व्यापक, विराट चळवळीचे स्वरुप दिले. शंकरराव खरात डॉ. आंबेडकरांबद्दल म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रारंभापासून ते शेवटच्या मुक्तिलढ्यापर्यंत दलितांना भयंकर अशा क्रूर गुलामगिरीतून मुक्त करून अस्पृश्य, दलित माणसाला माणुसकी, स्वातंत्र्य, समता, बंधुता मिळवून देऊन त्यांची अस्मिता व स्वाभिमान जागृत करून त्यांचा उद्धार, उन्नती व उत्कर्ष करणे हाच त्यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्रांतिकार्याचा मूलभूत सिद्धांत होता.''[१७] मूलगामी ध्येयउद्देश त्यांच्या मागे होते. त्यातून माणूस हाच त्यांच्या मुक्तिलढ्याचा केंद्रबिंदू होता, अगदी त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत.

दलितांची मानसिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी, त्यांचे आत्मभान जागृत करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी वृत्तपत्रांतून सातत्याने लेखन केले. दलित समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी १९४६ साली मुंबईत सिद्धार्थ महाविद्यालय आणि १९४९

साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. हे महाविद्यालय दलित चळवळींचे व दलित साहित्याचे केंद्र बनले. या महाविद्यालयात स्थापन झालेल्या बोधी मंडळाने अनेक दलित विद्यार्थ्यांना लिहिण्याची प्रेरणा दिली आणि शिक्षण घेणारी दलितांची पहिली पिढी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी भारावून गेली. या पिढीतला दलित तरूण आपल्या भावना शब्दांत मांडण्याचा प्रयत्न करू लागला. सुरुवातीच्या काळात दलित लेखकांचे लेखन सवर्ण प्रकाशक, संपादक छापत नव्हते. दलित लेखकांच्या लेखनाची साधी दखलही घेतली जात नव्हती. तरीही दलित लेखक लिहितच होते. यांतूनच २ मार्च १९५८ रोजी दादर इथल्या बंगाली हायस्कूलच्या सभागृहात दलित लेखकांचे पहिले साहित्य संमेलन भरले. या संमेलनात दलित साहित्याचे सांस्कृतिक महत्व ओळखून दलित साहित्याची योग्य दखल घेतली पाहिजे, असा ठरावही पास करण्यात आला. म्हणूनच डॉ. आंबेडकरांबद्दल भालचंद्र फडके म्हणतात, ''जीवनाचे असे एकही क्षेत्र नाही की ज्या क्षेत्रात बाबासाहेब ज्ञानाचा दिवा घेऊन गेले नाहीत. आपल्या अज्ञानी बांधवांना त्यांनी ज्ञानाची वाट दाखविली. दारिद्र्यात खितपत पडलेल्या दलितांची अस्मिता जागृत केली. अन्याय, छळ निमूटपणे सहन करणाऱ्या दलितांच्या मनात विद्रोहाची ठिणगी टाकली''[१८]. स्वातंत्र्योत्तर काळातील दलित तरुण शिक्षित झाल्याने अनेक दलित तरुणांनी प्रस्थापित समाजरचनेविरुद्ध असलेला आपला मनातील नकार आणि विद्रोह लेखनांतून व्यक्त केला. या लेखनालाच 'दलित साहित्य' असे संबोधण्यात येते. स्वत्व, तेज व आत्माभिमान जागृत ठेवण्याचे कार्य हे डॉ. बाबासाहेबांनीच खऱ्या अर्थाने केलेले आहे. यावरूनच दलित चळवळींचे मूळ व दलित साहित्याचे मूळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याच विचारप्रणालीत शोधावे लागते.

सद्य:स्थितीत दलित साहित्याला आणि दलित लेखकाच्या निर्मितीला एक वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप प्राप्त झाले आहे. दलित लेखकांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये काव्य आणि कथात्मक साहित्य हे एकूण दलित साहित्याचे महत्वपूर्ण अंग म्हणावे लागेल. त्या मानाने दलित कादंबरी, नाटक, समीक्षा मोजक्या प्रमाणातच अभिव्यक्त झाल्याने.

15425

वेगवेगळ्या साहित्यिकांनी दलित साहित्याच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यावरुन दलित साहित्याचे स्वरुप स्पष्ट होते.

मागासांच्या दलितपणाचा विचार करीत असताना या व्याख्या सामाजिक मागासलेपणाबरोबरच आर्थिक मागासलेपणाचाही विचार करतांना दिसतात. डॉ. आंबेडकरांच्या चळवळींमुळे दलित समाजाला आत्मभान आले. त्यांच्या 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या संदेशाने ज्ञानाची कास धरून, जागृतीची नवी दृष्टी, जीवनाचे नवे अर्थ प्राप्त करून घेण्याची जिज्ञासा लाभली. हजारो वर्षांपासूनचे चाललेले जुलूम तोडून टाकले आणि दलित समाज क्रांतिनिष्ठ बनला. क्रांतीसाठी त्याने जीवन जगण्याचे नाते संघर्षाशी जोडले. अशा प्रकारे दलित साहित्यिकांनी 'दलित' या संज्ञेतून आपल्या वेगवेगळ्या भूमिका विशद केल्या आहेत. 'सामाजिकता, सांस्कृतिक व आर्थिक बाबींपासून ज्यांना अन्य समाजांनी दूर ठेवले आहे ते सर्व दलित होय.' असा विचार दलित साहित्यिक मांडताना दिसतात.

सद्य:स्थितीत दलित साहित्याला आणि दलित लेखकाच्या निर्मितीला एक वैशिष्ट्यपूर्ण स्वरुप प्राप्त झाले आहे. दलित लेखकांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये काव्य आणि कथात्मक साहित्य हे एकूण दलित साहित्याचे महत्वपूर्ण अंग म्हणावे लागेल. त्या मानाने दलित कादंबरी, नाटक, समीक्षा मोजक्या प्रमाणातच अभिव्यक्त झाले. वेगवेगळ्या साहित्यिकांनी दलित साहित्याच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यावरून दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट होते.

*** त्र्य.वि. सरदेशमुख :**

'दलित जीवनाचे दर्शन देणारे, दलितांचे विचार व भावना प्रकटवणारे दलितांनीच लिहिलेले साहित्य हे दलित साहित्य' अशी त्र्यं.वि. सरदेशमुख यांनी दलित साहित्याची व्याख्या केली आहे.[११]

*** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते :**

'दलितांनी निर्माण केलेल्या साहित्याचा गाभा व त्यातून होणारी प्रेरणा कशी आहे, हे तपासले पाहिजे. दलितांची दु:खे, कुचंबणा गुलामगिरी, कौटुंबिक अध:पात, विटंबना यांबरोबरच दारिद्र्यातही तळपणारे सामर्थ्य, शौर्य, इत्यादी साहित्य होय.[२०]

* **बाबुराव बागूल :**

'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य.[२१] अशी दलित साहित्याची व्याख्या बाबुराव बागूल करतात.

* **शंकरराव खरात**

'दलित' या शब्दप्रयोगाच्या व्याख्येत व व्याप्तीत येणाऱ्या उपेक्षित व्यक्तींचे जीवन, जाती-जमाती व त्यांचे वर्गसमूह यासंबंधी जे वाङ्मय साहित्य निर्माण झाले व होत आहे, तेच दलित साहित्य होय.[२२]

* **गंगाधर पानतावणे :**

'दलित म्हणजे आंबेडकरवादाची स्वप्नपूर्ती करणारा क्रांतीचा वाहक, परिवर्तनाचे नवे जग निर्मिण्याची आकांक्षा बाळगणारा असा अर्थ दलित साहित्याने स्विकारला आहे. दलित साहित्य याच प्रकारात शोधावे लागते. आंबेडकरवादाचेच दुसरे नाव दलित साहित्य होय.[२३]

* **वि.स. जोग :**

हिंदुधर्मातील रुढींनी ज्यांना जन्मजात अस्पृश्यता दिली आहे, अशा अस्पृश्यांनी आपल्यावरील या जन्मसिद्ध कनिष्ठत्वा बद्दलच्या अन्यायाविरुद्धचा आवाज ज्या साहित्यात उठवलेला आहे ते साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.[२४]

*　**प्रभाकर मांडे :**

'दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह की ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावला गेला आहे. ज्यांच्या जन्माने माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरिले गेले आहे. ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले आहे, ते दलित.[२५]

*　**दत्ता भगत :**

'आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टीकोनाद्वारे स्वत:ला आणि स्वत: भोवतालच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कृष्ट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय'[२६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या प्रेरणेतून दलित साहित्याचा विचार करीत असताना या व्याख्या सामाजिक, आर्थिक विषमतेचा विचार करताना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनकार्य आणि तत्वज्ञान दलित साहित्याचा मूलभूत व अपरिहार्य आधार आहे. या साहित्यातील समाज हा अन्यायी, अत्याचारी जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, संस्कृती यांच्यापासून नाहकपणे नागविला गेला आहे. आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी हे साहित्य तयार झाले आहे. मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे हे साहित्य असून ते आशयप्राधान्यवादी आहे. परिवर्तनशील आशय व पारंपरिक अभिव्यक्ती असे या साहित्याचे स्वरूप आहे, असे मत दलित साहित्यिक वरील व्याख्येतून मांडताना दिसतात.

**दलित साहित्याची वैशिष्ट्ये :**

डॉ. नंदा मेश्राम यांनी दलित साहित्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे मांडली आहेत.

१)　''दलित साहित्य ही संकल्पना आता रुढ झालेली आहे. या दलित साहित्याच्या निर्मितीमागे असणारी आपल्या देशातील विषमता, चातुर्वर्ण्यव्यवस्था, धर्माच्या श्रीमंत तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष आचरणातील कटूपणा होय. तसेच अतिश्रेष्ठ

म्हणविणाऱ्या वर्गाचा, स्वार्थी दूरदृष्टीने केलेला विचार आणि स्वत:च्या बाबतीतला धूर्त अहंकार, कर्मकांडांनी व रुढी-परंपरांनी नागवलेला नगण्य बहुजन माणूस, यांच्या द्वंदांतूनच दलित साहित्य निर्माण झाले.

२) आजच्या समाजव्यवस्थेतील नगण्यत्वाचा डाग पुसून काढण्यासाठी आत्मभानाचा आणि अस्तित्वशोधाचा हुंकार दलित साहित्यातून व्यक्त होऊ लागला.

३) आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचे, नाहक लादलेल्या गुलामगिरीचे, पूर्वपिढ्यांच्या विनाशाचे, सहन केलेले दारिद्र्य व दु:खांच्या जळजळीचे मूळ कारण, रोखठोकपणा व्यक्त करणारी वेदना आरंभीच्या लेखनातून तीव्रपणाने आणि आवेगपूर्ण रितीने शब्दबद्ध होऊ लागली.

४) या पीडेवर मात करण्यासाठी संघर्ष करण्यास उत्तेजित करणारी मानसिकता निर्माण झाली. देव, धर्म, ग्रंथप्रामाण्य, पुरोहित, दैव, कर्मविपाक जन्मपुनर्जन्मांच्या आणि पापपुण्यांच्या खोट्या कल्पना या सगळ्यांना ठोकरण्याची क्षमता प्राप्त होऊ लागली. या सर्व पातळ्यावरील उठावालाच विद्रोह असे म्हणतात. द्रोहात फसवणूक, विश्वासघात आणि वंचना असते पण विद्रोहात आत्मजागृतीचे भान असल्याने, तो छळल्या जाणाऱ्या व्यक्तींचा अधिक जवळचा अधिकार ठरतो.

५) ज्या कारणांनी आणि घटकांनी माणसाला अस्पृश्य आणि दलित संबोधले, त्याच्या सावलीचा विटाळ मानला गेला, थुंकण्यासाठी गळ्यात गाडगे आणि विटाळलेली जमीन स्वच्छ व्हावी म्हणून कमरेला खराटा लटकावून त्यांची विटंबना केली गेली, त्या माणसाने या सगळ्या गोष्टींचाच त्याग करण्याची प्रतिज्ञा करणे आणि त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणे हे स्वाभाविकच होते. ह्यामधूनच दलित साहित्याला जबरदस्त नकाराची प्रेरणा मिळाली.

६) आज विज्ञानाचा आश्चर्यकारक प्रसार जगभर झाला आहे. अनेक नवनवे शोध उदयाला येत आहेत पण आपल्या भारत देशातील जातीयतेची कीड आणि त्या

तऱ्हेची मानसिकता मात्र बदलतच नाही. म्हणूनच 'जात नाही ती जात' असे समीकरण जातीव्यवस्थेबद्दल म्हटले जाते. जगात माणूस आणि त्याची सुखदु:खे ही समान आणि एकाच पातळीवरील आहेत. ही धारणा दलित साहित्य स्विकारते.

७) दलित साहित्याने या विविक्षित अधिष्ठानावर अधिक भर दिल्याने दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्याची आवश्यकता त्यामुळेच भासत नाही.''[२७]

वरील वैशिष्ट्ये वेगवेगळ्या स्वरूपामध्ये दलित साहित्यात आढळून येतात. याच पार्श्वभूमीवर दलित कादंबरीचा प्रवाह विकसित झाला.[२७]

## * दलित कादंबरी :

दलित साहित्याच्या प्रेरणेचा मूलस्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी मांडलेले विचार होत. अस्पृश्य बांधवामध्ये वैचारिक जागृती व्हावी, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना १९४५ मध्ये करून सिद्धार्थ कॉलेज व मिलिंद महाविद्यालय यासारखी शिक्षणकेंद्रे निर्माण केली. जनजागृती व्हावी म्हणून 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही साप्ताहिके सुरू केली. या साप्ताहिकांच्या नावातच त्यांनी आपल्या सामान्य जनतेला नायकत्व बहाल करून, संघटित होऊन संघर्ष करण्यास प्रवृत्त केले आहे. या वृत्तपत्रांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बांधवांमध्ये सतत जागृती निर्माण करून. होणाऱ्या अन्याय, अत्याचारांचे जाब विचारण्याचे कार्य केले. दलितांच्या लेखनाची निर्मितीही सामाजिक चळवळींतूनच झालेली आहे म्हणून दलित चळवळींचे मूळ आणि वाङ्मयीन चळवळीचे रूपही डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रणालीत शोधावे लागते. स्वत:चा उद्धार स्वत:च केला पाहिजे ही जाणीव दलितांमध्ये निर्माण होऊन नवा विश्वास व अस्मितेचा शोध लागला. आत्मभान येऊन ते निर्भयपणे वागण्याचा प्रयत्न करू लागले. डॉ. आंबेडकरांनी अपेक्षिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा प्रत्यय दलितांना प्रत्यक्षात कधीच आला नाही.कायद्याने नष्ट केलेली अस्पृश्यता प्रत्यक्षात सातत्याने पुन्हा पाठपुरावा करू लागली. ही कोंडी फोडण्यासाठी

लेखणी हा एक चांगला मार्ग आहे. लेखणीचे आणि वाणीचे स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य नसलेल्या, आर्थिक सुबत्ता नसलेल्या मूक समाजाला बोलके करण्यास प्रेरक ठरले. दलित साहित्याच्या संकल्पनेचे बीज या प्रक्रियेतच समाविष्ट होते.

अज्ञान, अंधश्रद्धा आणि गुलामगिरीचे भारतीय संस्कृतीने दलितांच्या डोक्यावर ठेवलेले ओझे, आपल्या कर्तृत्वाने लाथाडून, उदात्त मानवी मूल्यांची स्थापना करून विजय मिळविणारा विजयी पुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या इथल्या जाचक समाजव्यवस्थेला ठामपणे नकार देऊन विद्रोह पुकारणारा हा पहिला क्रांतिकारक होय व म्हणूनच ते दलित साहित्याचे प्रेरणास्थान ठरतात. अस्पृश्योद्धारासाठी चालविलेला 'दलितमुक्ती लढा' किंवा 'दलित चळवळ' हीच खरी दलित साहित्याची प्रेरणा आहे. यातूनच दलित आत्मोद्धार पोवाडा, काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, वैचारिक लेख, सभा, संमेलने, साहित्यमेळावे इत्यादींमधून विद्रोह प्रकट होऊ लागला. या प्रेरणांमधून मराठी वाङ्मयामध्ये दलित साहित्य आणि विशेषत्वाने दलित कादंबरीचाही प्रवाह विकसित होत गेला.

ज्या समाजाला आपले अस्तित्व ठाऊक नव्हते, ज्याला मोकळा श्वास घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते, पिढ्यानपिढ्या तो जातीय, सामाजिक, आर्थिक अन्याय सहन करीत आला होता, तो समाज नुकताच बोलू लागला होता. पूर्वापार चालत आलेल्या हिंदू रुढींना आणि हिंदू धर्माला नकार देण्यास सुरुवात झाली. ज्या हिंदू धर्मात माणूस म्हणून जगण्यास स्वातंत्र्य नाही, अशा हिंदू धर्माचा निषेध करण्याचा आत्मविश्वासपूर्ण हक्क तळागाळातील बहुजन वर्गामध्ये झाला. १९२० नंतरच्या कालखंडात कविता, कथा, वैचारिक निबंध यांचे लिखाण, थोडेबहुत झाल्याचे आढळते. पहिली कथा तुकाराम अंबादास पुरोहित यांनी १९३३ मध्ये लिहिली परंतु दलित कथा, कविता यांच्या मानाने दलित कादंबरीचा विकास बऱ्याच उशिरा झाल्याचे आढळून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये दलितांनी किंवा दलित लेखकांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकार आत्मविश्वासाने हाताळलेला आढळतो. खऱ्या अर्थाने

१९६० नंतरच दलित कादंबरी हा वाङ्मयप्रकार जोमाने विकसित झालेला दिसतो. स्वातंत्र्यानंतरच्या काळात जे अनेक बदल झाले त्या बदलांतूनही अनेक समस्या निर्माण झाल्या. दलित समाजाने धर्मांतर केल्याने औद्योगिकतेला अधिक महत्व आले. कामधंद्याच्या शोधात माणसे शहराकडे येऊ लागली. शहरासारख्या ठिकाणी जागा मिळणे हा सर्वात मोठा गहन प्रश्न असतो. यातून वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या निर्माण झाल्यामुळे जीवनात आलेला बकालपणा, आवासून समोर असलेल्या असह्य यातना, पोटापाण्याचे व राहण्याचे हाल या व अशाच भयानक घटनांचे दर्शन शंकरराव खरात यांच्या 'फूटपाथ नं. १,' व 'झोपडपट्टी' या सारख्या अनेक कादंबऱ्यांमधून आढळते. फुटपाथला रस्त्यावर झोपडे बांधून जगणाऱ्या अगदी तळागाळातील लोकांचा आसरा, निवारा, अन्न, पाणी, वस्त्र, त्यांच्या शारीरिक, मानसिक गरजा, त्यांच्या पोटाची भूक क्लेशकारी असते. ही भूक संस्कृती, संस्कार यांना झुगारून अगतिकतेने सर्वस्वावर मातही करायला लावते.

वरेरकर, दिघे, माडखोलकर, अरुण साधू, जयवंत दळवी, मधू मंगेश कर्णिक यांच्या काही कादंबऱ्यांमध्ये दलितांच्या जीवनाची चित्रे रेखाटली गेली आहेत. त्यांच्या कादंबऱ्या ब्राह्मणी दृष्टिकोनातून साकार झाल्यामुळे दलितांच्या अवनतीला कारणीभूत झालेल्या हिंदूंच्या समाजरचनेला त्यांनी जबाबदार धरले नाही. दलित कादंबरीविषयी समीक्षकांची मते खालीलप्रमाणे आहेत.

*** डॉ. प्रकाश खरात यांच्या मते :**

कविता व कथेप्रमाणे एक वाङ्मयप्रकार म्हणून दलित कादंबरीला हवी तशी गती अजूनही प्राप्त झाली नाही परंतु दलित कादंबरीचे सामर्थ्य ते मान्य करतात. मराठी कादंबरीपेक्षा वेगळे जीवन व वेगळी संवेदनशीलता घेऊन आलेली दलित कादंबरी पारंपरिक समाज व्यवस्थेविरूद्ध विद्रोह पुकारून न्याय हस्तगत करण्यासाठी सज्ज झालेली आहे. मानवी जीवनाकडे आंबेडकरी दृष्टीने पाहून मानवी मनाची मीमांसा करणे हे दलित कादंबरीचे तत्व ते विशद करतात. 'दलित कादंबरी प्रामुख्याने विद्रोहाच्या पातळीवर

आविष्कृत झालेली असून दलितांच्या आयुष्याची दु:खे आकांक्षा याचे चित्रण करण्यात ती यशस्वी झाली आहे.[२८]

* **प्रा. वसंत डोळस यांच्या मते :**

दलित कादंबरी दलित समूहजीवनाचे व सामाजिक बांधिलकीचे तत्व जपताना दिसते. शिवाय, पिढ्यानपिढ्या वाट्याला आलेली सामाजिक उपेक्षा, अन्याय निमूटपणे सहन करणारी माणसे, तद्‌वतच अन्यायाविरुद्ध टक्कर देणारी माणसेही दलित कादंबरीत चित्रित झाल्याचे डोळसांना आढळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण, तत्वज्ञान व धर्मांतरित दलितांचे जीवन दलित कादंबरीतून चितारण्यात आल्याचे वसंत डोळस म्हणतात. त्यांच्या मते कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीसाठी चिंतनात्मक दृष्टिकोनाची गरज असते. दलित साहित्यिक आपल्या समाजाकडे आपल्याच भूमिकेतून पाहतात.

दलित साहित्यातील कादंबरींच्या अभावाची चर्चा करताना ते म्हणतात, ''दलित साहित्याच्या चळवळीमुळे एका विशिष्ट भूमिकेने दलित जीवनानुभवांचा केलेला स्विकार आणि आविष्कार व त्यामुळे स्विकारले जाणारे विशिष्ट स्वरुपाचे अनुभव हे दलित साहित्यातील कादंबरीच्या अभावाचे महत्वाचे कारण आहे.[२९]

* **डॉ. भालचंद्र फडके :**

''स्वातंत्र्यानंतरची कादंबरी व्यक्तिनिष्ठ सुखदु:खांचे चित्रण करण्यातच अधिक रंगली, 'वासूनाका', 'चक्र' व 'माहिमची खाडी' या कादंबरींतून दलितांच्या उपेक्षित जीवनस्तरांचे मन हेलावून सोडणारे जीवनदर्शन साकार झाले. झोपडपट्टीतील भयाण वास्तवाचे मूळ सामाजिक व आर्थिक विषमतेत असते. दलितांच्या कादंबरीतील जीवन, त्यातील माणसे, त्यांची संस्कृती या सगळ्या बाबी मराठी कादंबरीपेक्षा वेगळ्या आहेत, असे त्यांना वाटते.[३०]

* **अनिल गजभिये :**

दलित कादंबरीचा चिकित्सक विचार केला, तो डॉ. अनिल गजभिये यांनी. दलित कादंबरीविषयी आपले मत मांडताना ते म्हणतात,'' दलित कादंबरीत द्वेष, मत्सर व सूड या विनाशकारी भावनांवर बुद्ध विचारांचे पाणी शिंपडण्यात येते आणि 'पंचशीला' ला भावभूत मानून चित्रण होत असल्याचे गजभिये म्हणतात. दलित कादंबरी ही आंबेडकरी तत्वज्ञानावर आधारित असल्याने दैववाद व रूढीवाद यांचे उच्चाटन तिच्यातून झाल्याचे ते म्हणतात. दैववादाची जागा बुद्धिवादाने व विज्ञाननिष्ठेने, तसेच पुराणपंथाची जागा नव्या युगधर्माने घेतल्याची जाणीव दलित कादंबरीतून प्रकट होते. हरिभाऊ पगारेंनी 'युगप्रवर्तक' कादंबरीत दलितमुक्तीसाठी डॉ. आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पात्रांचे दैवीकरण केल्याचे गजभियेंना आढळते. बागूलांच्या 'सूड' व गायकवाड यांच्या 'शूद्र' कादंबरीतून बुद्धतत्वज्ञान व बुद्धाची शिकवण स्पष्ट होते. 'आंबेडकरी वचन व बुद्ध वचन हे दलित कादंबरीचे शिल्प आहे'. असे त्यांना वाटते.[३९]

वरील सर्व साहित्यिकांच्या मतांनुसार दलित कादंबरीची प्रेरणा डॉ. आंबेडकर व त्यांची मानवमुक्तीची चळवळ आहे हे स्पष्ट होते. दलित कादंबरीतील आशय हा वेगळ्या स्वरूपाचा असल्याचे ते मान्य करतात. दलित समाजाचे चित्रण व त्यांच्या उन्नतीसाठी दलित कादंबरीने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, केशव मेश्राम आदींनी 'दलित कादंबरी' असा वेगळा प्रकार मानायला लावण्याइतपत कादंबरी लेखन केलेले आढळते.

## २.२ दलित कादंबरीचे निराळेपण :

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक जोमदार प्रवाह निर्माण झाला. दलित साहित्याच्या उग्रतेत, संतापात व नकारात फार मोठी पार्श्वभूमी आहे. 'दलित साहित्याचा हा नवा प्रवाह ही एक तात्कालिक घटना नाही, तर मानवत्वाची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य शिरोधार्य मानणाऱ्या एका विराट आंदोलनातून दलित साहित्य जन्मलेले आहे.

हे सूडवाद्यांचे साहित्य नव्हे, तर ते 'माणुसकी'साठी लढणाऱ्यांचे साहित्य आहे. दलित साहित्य हे या देशाच्या मातीतून उदयास आलेले साहित्य आहे. आंबेडकरांची प्रक्षोभक, आक्रमक व क्रांतीप्रवण भूमिका, बुद्धाची प्रज्ञाशील करुणा या साहित्याने स्विकारलेली आहे. बौद्ध संस्कृतीचा आविष्कार दलित साहित्यातून अभिव्यक्त होत आहे. मराठी साहित्याला वाङ्मयीन कलाकृतीच्या अभिनवतेचे योगदान दलित साहित्यानेच दिले आहे. मराठी साहित्यात अनेक नव्या गोष्टींची भर दलित साहित्याने घातली. कविता, कथा, आत्मकथन इत्यादी वाङ्मयप्रकारांच्या संदर्भात हे जसे आणि जितके खरे आहे, तसेच ते दलित कादंबरीच्या बाबतीतही मानावे लागेल. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातील दलित कादंबरीचे वेगळेपण, निराळेपण चटकन लक्षात राहणारे आहे. दलित साहित्यातील कथा, कविता, आत्मकथन इत्यादी वाङ्मय प्रकारांच्या दृष्टीने 'दलित कादंबरी' हा साहित्यप्रकार क्षीण वाटतो. दलित कादंबरी हवी तशी ताकदीने विकसित झालीच नाही. संख्यात्मक विचार करता हे पटते. परंतु गुणात्मक दृष्ट्या पाहता दलित साहित्यात वेगवेगळ्या स्तरातील दलितांचे जीवनचित्रण, त्यांचे विविध प्रश्न हाताळणाऱ्या आणि इतर विषयांवरील लिखाण झालेल्या भरपूर कादंबऱ्या निर्माण झालेल्या आढळून येतात. त्यांचे स्वरूप कलादृष्ट्या अप्रगल्भ असेल परंतु सामाजिक आशयाच्या प्राधान्यतेने दलित कादंबरी ही दलित साहित्याच्या दालनात वाढ करणारी ठरली. त्यातही दोन प्रकार लक्षात येतात. स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून ते आजतागायत दलित व दलितेतर कादंबरीकारांनी दलित जीवनाचे चित्रण कादंबऱ्यांतून केलेले आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, सुधाकर गायकवाड, यशवंत मनोहर इत्यादींनी दलित कादंबरी लेखन केले आहे. दलित कादंबरीतून व्यक्त होणारी सामाजिक जाणीव व सौंदर्य दलितांच्या जगण्यामरण्यातून साकारले आहे. ही दलित कादंबरीची श्रेष्ठ उपलब्धी ठरते. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीतील दलित कादंबरीचे निराळेपण खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते.

## * कथानक :

कथानकाला कादंबरीत अधिक महत्व आहे. कादंबरीचा गाभा म्हणजे कथानक होय. याला 'कथाबीज' असेही म्हणतात. कथानकात अनेक प्रसंगांची कालानुक्रमे साखळी असते. कथानकात कालानुक्रमाने प्रसंगांची मालिका नसून त्यामधील कार्यकारणभावाचा दुवाही स्पष्ट करावा लागतो. कथानक म्हणजे कथेचा गाभा होय. कथानकाच्या तीन अवस्था असतात. त्या म्हणजे प्रारंभ, मध्य व शेवट. प्रारंभ याचा अर्थ पुढील घडामोडींची भूमिका तयार करणे प्रारंभापासून कथानकाचा टप्याटप्याने विकास होऊन त्यामध्ये तर्कसंगती निर्माण होते. तसेच कथानकाच्या अंताकडे जाणारी वाटचाल असते. ॲरिस्टॉटल यांच्या मते कलाकृतीतील कथानकाचा शेवट स्वाभाविक असावा. कादंबरीचे कथानक आकर्षक करण्यास कार्यकारणमीमांसा व कुतूहल निर्मिती हे दोन गुण आवश्यक आहेत.

## * संघर्ष :

'संघर्ष' हा कथानकाचा महत्वाचा घटक आहे. कादंबरीमध्ये जीवनातील विविध विषयांचे चित्र रंगविले जाते. जीवन हा एक संघर्ष आहे. जीवनामध्ये अनेक चढउतार असतात. अनेक संघर्षमय प्रसंगांना सामोरे जावे लागते. हा संघर्ष कधीकधी व्यक्तिगत तर कधी सामाजिक असतो. यातूनच मनुष्याची खरी कसोटी दिसून येते. याच जीवनाचे चित्रण कादंबरीमध्ये दिसून येते. एकिकडे सद्‌गुणी, धर्मशील सतवर्ग असतो. तर दुसरीकडे दुर्गुणी, असत प्रवृत्तीचा वर्ग असतो. या दोन वर्गांमध्ये सतत संघर्ष असतो. त्यामध्ये शेवटी सद्‌गुण, सतप्रवृत्तीचा विजय होणे ही परंपरा ग्रीक काव्यापासूनची आहे. काहीवेळा व्यक्तिगत संघर्ष कारणीभूत न ठरता विरोधी परिस्थिती, नियती, संस्कृती कारणीभूत ठरत असते.आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीमध्ये निसर्ग, नवीन संस्कृती ही नारबाच्या दु:खाला कारणीभूत ठरते. यातून नारबाच्या रुपाने एका वेगळ्या नायकाची जाणीव होते. नारबाची, एकट्याची मनोव्यवस्था न राहता, अतिसामान्य माणसाच्या मनोवेदना त्या कादंबरीतून व्यक्त होतात. दलित कादंबरीतला संघर्ष हा प्रामुख्याने ग्रामीण भागात आढळतो. ग्रामीण भागात

असणाऱ्या दलितांचा संघर्ष जसा स्वत:शी चालू असतो, तसा तो ग्रामव्यवस्थेशीही चालू राहतो. ग्रामीण भागातील जातीव्यवस्था कधीही नष्ट होत नाही. शरणगुप्पी गावाचे प्रतिक घेऊन गावामध्ये जातीव्यवस्था किती पक्की आहे याचा आधार घेऊन राजकारण कसे खेळले जाते, दलित बिचारा कसा अकारण व नाहक मारला जातो, याचे वास्तववादी चित्रण उत्तम कांबळे यांच्या 'श्राद्ध' या कादंबरीमध्ये आढळते. महार आणि चांभार या दलित जातींतील आपापसातील जातीचे वैर कसे असते, गावात दलितांसाठी, गोरगरीब सामान्यांसाठी निघणाऱ्या सहकारी सोसायटीमधून सवर्णीय राजकीय लोक, राजकारण करून अस्पृश्य समाजाचे सर्वांगीण शोषण कसे करतात ? स्वार्थासाठी दलितांचा कसा वापर करतात, जातींजातीमध्ये कलह निर्माण करण्यासाठो आणि फुटीरता कायम राखण्यासाठी कसे सतर्क असतात यांची चांगली मांडणी दलित लेखक उत्तम कांबळे यांनी केली आहे.

## * व्यक्ती व समाज यांचे चित्रण :

दलित कादंबरीमध्ये कथानकातून दलित जीवनाची कथा व्यक्त होते. दलितांना सहन कराव्या लागणाऱ्या अन्याय, अत्याचार, दारिद्र्याची व्यथाच व्यक्त केली जाते. ही कथा एकट्या व्यक्तीचीच रहात नाही तर ती सर्व समाजाची असते. एका अर्थी व्यक्ती म्हणजे समाज आणि समाज म्हणजे व्यक्ती असे समीकरणच सांगता येते, कारण, समाज व व्यक्तीला भोगावे लागणारे दु:ख हे एकसारखेच असते. उदाहरणार्थ, केशव मेश्राम यांच्या 'हकिकत आणि जटायू' या कादंबरीतला 'जटायू' मधला अभिमान घेता येईल. अभिमान हा एकट्याचा प्रश्न असत नाही, तर तो विशिष्ट समाजाचा प्रश्न आहे असे लक्षात येते. मुरलीधर जाधव यांच्या 'कार्यकर्ता' या कादंबरीमध्ये, त्या एकट्या कार्यकर्त्याचे दु:ख नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन दलित चळवळीतील, प्रत्येक कार्यकर्त्याचे दु:ख आहे. तो सर्वस्व पणाला लावून कार्य करतो. दलित कादंबरी ही परंपरेतून निर्माण झालेली कादंबरी नसून ती प्रयोजनातून निर्माण झालेली कादंबरी आहे. वेगळा

समाज निर्माण करण्यासाठी, माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळावी याकरिता दलित कादंबरीचा जन्म होतो.

प्राचीन काळापासून सहन करीत असलेल्या अस्पृश्यतेच्या वेदनेला दलित कादंबरीने अधिक महत्व दिले आहे. तसेच बौद्ध धर्मांतरापूर्वी आणि धर्मातरानंतरही, दलित समाजाला सहन कराव्या लागणाऱ्या हिडीसफिडीसपणाचे चित्रण बऱ्याच कादंबऱ्यांमधून आढळते. आपले अस्तित्व आणि करावा लागणारा संघर्ष हा ना.रा. शेडे यांची – 'काजळी' रात्र, सुगंधा शेंडे यांची – 'फिपुली', बा.स. हाटे यांची – 'मुक्तिसंग्राम', भीमसेन देठे यांची – 'इस्कोट', वैजनाथ कळसे यांची – 'तीन भिंती', सुधाकर गायकवाड यांची – 'शूद्र' आणि इतर कादंबऱ्यांमधून संघर्षाचे चित्र दिसून येते.

## * **वातावरणनिर्मिती :**

कादंबरी रचनेत व्यक्ती या घटकाबरोबर 'वातावरण' या घटकालाही महत्व आहे. किंबहुना, वातावरणनिर्मिती हा कादंबरीचा एक लक्षणीय विशेष मानला जातो. कथानक आणि व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यासाठी वातावरणाचा फार उपयोग होतो. कादंबरीतील व्यक्तींच्या अंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे सामर्थ्य 'वातावरणा'मध्ये असते. वातावरण हा कादंबरीचा एक अविभाज्य घटकच असतो. उदाहरणार्थ, उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' या कादंबरीमध्ये दुपारच्या उन्हाचे वर्णन चित्रित केलेले आहे. निसर्गातील दैनंदिन घटना आणि मानवी जीवन यांची सांगड घातली आहे. दुपारच्या उन्हासारखेच 'जगनचे' जीवनही रखरखीत आहे. अशी सूचकता कादंबरीच्या प्रारंभीच लेखक सूचीत करताना दिसतो.

कादंबरीला जो आशय व्यक्त करायचा असतो, त्याचा काळ निश्चित केलेला असतो. सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक कादंबऱ्यांमधून वेगवेगळे आशय व वातावरणनिर्मिती केलेली असते. यावरून त्याचे प्राकृतिक आणि सामाजिक असे भाग पाडता येतात. प्राकृतिकमध्ये स्थळ – निसर्ग इत्यादींचे सूक्ष्म अचूक वर्णन, तर सामाजिक

पार्श्वभूमीच्या बाबतीत विशिष्ट समाजाचे निरीक्षण केलेले असते. उदा. उत्तम बंडू तुपे यांच्या 'भस्म' या कादंबरीमध्ये 'भस्मी' या जमातीचे वर्णन केले आहे. तसेच केशव मेश्राम यांच्या 'पोखरण' मधील आदिमकाळातील डांगखेड्याचे वातावरण आहे. ते आधुनिक युगातील शहरी वातावरण असो, कोर्टातील गंभीर वातावरण असो किंवा झोपडपट्टीतील बकाल जीवनाचे वातावरण असो, बौद्ध दीक्षा समारंभाचे वातावरण असो, संघर्षाचे असो, अगर एखाद्या मोर्चाचे असो, असे वातावरण वास्तविकपणे कादंबऱ्यांमधून उभे केलेले दिसते. म्हणजेच आशयानुरुप वातावरण हा कादंबरीचा महत्वाचा पैलू असलेला दिसून येतो.

### * पुराणकथांचा वेगळ्या दृष्टीने वापर :

हिंदूंच्या पुराण साहित्यात देवदेवता, ऋषी, साधूसंत, कर्मकांड, देवतांचे महत्व यांविषयी अनेक कथा आढळतात. रामायण आणि महाभारत हे आपले धार्मिक ग्रंथ मानले जातात. यातील कल्पना, प्रतिके, प्रतिमा यांना वेगळे रूप देण्याचा प्रयत्न दलित कादंबरीकार करताना दिसतात मेश्रामांच्या 'हकिकत आणि जटायू' या कादंबरीमध्ये जटायू हा स्वाभिमानी आहे. पंखहीन असूनही स्वाभिमानाच्या प्रकाशाने उजळून निघाला आहे, तर रामायणातील जटायू हा दुर्बलांचे रक्षण करता करता पंखहीन होऊन गलितगात्र होतो. तसा मेश्रामांच्या कादंबरीतील जटायू परिवर्तनासाठी धडपडणारा आहे. जयवंत व्हटकर यांच्या 'जटायू' कादंबरीमध्ये शासनाच्या नोकरदरबारी उच्चभ्रूंच्यासमोर पंख छाटलेले जटायू म्हणजे दलितच आहेत.

आशयानुरुप भाषाभिव्यक्ती दलित कादंबरीमध्ये व्यक्त होताना दिसते. अत्यंत प्रत्ययकारी बोलीभाषा किंवा प्रमाणभाषा यांचा वापर करून दलित जीवनाचे विविधांगी चित्रण, त्यांच्या उद्योगव्यवसायांचे, धुराने कोंडलेल्या घराचे चित्रण, ज्या घरांना धड भिंती नाहीत, छप्पर नाही, त्याचे चित्रण, सर्व बाजूने दुःखाने दारिद्र्याने घेरल्याचे चित्रण, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय - अत्याचारांचे चित्रण जिवंत व सूक्ष्म भाषेत दलित कादंबरीमध्ये आढळून येते. अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या 'मकडीच्या माळा' चे चित्रण

आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. आपण त्या माळावर उभे आहोत आणि त्यातलाच आपण ही एक घटक आहोत, असे वाटते. कादंबरीतील प्रत्येक घटना आपल्या डोळ्यांसमोरच घडते आहे असा भास निर्माण होतो.

### * भाषा – रुढी, संकेतांना धक्के :

दलित लेखकांनी दलित जीवनाचे चित्रण करताना दलित कादंबरीतील आशयाभिव्यक्ती अत्यंत प्रभावी व्हावी, याकरिता आपल्या समाजातील, जातीतील बोलीभाषेचा प्रामुख्याने उपयोग केलेला आहे. निवेदनाच्या भाषेतून सौंदर्यनिर्मिती व्हावी, पात्रांची भाषा भारदस्त असावी या सर्व रुढ संकेतांना फाटा देऊन बोलीभाषेचा वापर अधिकांशाने केलेला आढळतो. यामुळेच प्रादेशिक भाषांचे वेगळेपण दलित कादंबरीतून व्यक्त झालेले दिसते. कोकण विभागातील कोकणी भाषा व प्रामुख्याने चर्मकारांची भाषा माधव कोंडविलकर यांच्या 'अजून उजाडायचं आहे', 'अनाथ', 'वेध', 'झपाटलेला', 'छेद' या कादंबऱ्यांमधून आढळते. 'युगविधान', 'युगंधर', 'युगांतर' या कादंबऱ्यामधून रायगडमधील बोलीभाषेचा प्रभाव दिसून येतो. सांगली, सातारा, कोल्हापूर येथील बोलीभाषेचा प्रत्यय 'फकिरा', 'चित्रा', 'वैजयंता', 'आक्रंदन', 'जागृती' या कादंबऱ्यांतून येतो. पुणे परिसरातील बोलींचा प्रत्यय 'कार्यकर्ता', 'निगेटिव्ह स्पेस', 'हाडकी हडवळा' या कादंबऱ्यांतून येतो. महाराष्ट्र – कर्नाटक सीमेवरील बोलींचा प्रत्यय 'श्राद्ध', 'नापत', 'जोगव्याचे दिवस' या कादंबऱ्यांतून येतो. 'राघववेळ', 'ऊनसावली', 'हकिकत व जटायू', 'पोखरण', 'माझा गाव कुठाय' ? या कादंबऱ्यांतून खानदेशी, मराठी बोलीभाषांचा वापर झाल्याचे आढळून येते. आशयांतील अचूकपणा, तीव्रता व्यक्त करण्यासाठी मूळ संकेतांना नकार देऊन आपला एक वेगळेपणा उमटविण्याचा प्रयत्न दलित कादंबरी करते.

### * रूपक, प्रतीक, प्रतिमांचा समर्थपणे वापर :

दलित कादंबरीच्या निराळेपणातून दलित कादंबरी आपला वेगळा ठसा कादंबरी वाङ्मयामध्ये उमटविते. आशयाचे एक अविभाज्य अंग म्हणून रूपक, प्रतीक, प्रतिमांचा

वापर कादंबऱ्यामधून झालेला आढळतो. रात्र काळोखाच्या मगरमिठीत कण्हू लागली (मुक्ती) माय पुरातन लेण्यांसारखी झोपली (दंगल), विस्तवासारखं ऊन आणि त्यात प्यायला पाणी नाही (इस्कोट), माणसाएवढ्या देवाचं काय दर्शन घेऊ ? (सूड) यासारख्या रूपकांची अनेक ठिकाणी सहज केलेली योजना दलित कादंबरीतून दिसते.

कादंबरीच्या आशयाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी प्रतिकांचा वापर कादंबरीमधून आढळून येतो. जगनच्या गळ्यात दर्शन कवा बांधायचं? (झुलवा), विधवेच्या कपाळागत आभाळ पाहून प्रत्येकच उदासायचा (राघववेळ), सगळा मराठवाडा जणू रणांगण बनला होता(आग) इत्यादी प्रतीकांचा वापर दलित कादंबरीत आविष्कृत होतो.

प्रतिमांचाही तितक्याच जोरकसपणे वापर केलेला आहे. मुताच्या लोटासारखी क्रांती (माझा गाव कुठाय?), प्राण घुसमटून टाकणारा ओलाजर्द काळोख (हाडकी हाडवळा), मरीमायचे एकाकी देऊळ, शिव्यांचा कचकोल (हकिकत आणि जटायू) अशा प्रकारे दलित कादंबरीत प्रकट झालेल्या प्रतिमा कृत्रिम वाटत नाहीत, तर आशयांत एकजीव होऊन, अपरिहार्यपणे व्यक्त झालेल्या आढळतात. रुपक, प्रतिके, प्रतिमांचा समर्थपणे वापर करून दलित कादंबरी आपला वेगळा ठसा उमटविते.

***  वेदना, विद्रोह, नकार, संघर्ष यांची जाणीव :**

दलित कादंबरीच्या निर्मितीमागे वेदना, विद्रोह, नकार, संघर्ष ही महत्वाची कारणे आहेत. दलित कादंबरीकार हे स्वत: खेड्यातीलच असल्याने दलितांची दु:खे, वेदना, विद्रोह त्यांनी स्वत: अनुभवले आहेत. दलितांना खऱ्या अर्थाने संघर्ष करावा लागतो तो खेड्यातच. इथल्या धर्माने व संस्कृतीने दलित माणसाला काय दिले असेल तर फक्त वेदनाच वेदना ! वेदनामय जीवन हे दलितांच्या वाट्याला आलेले प्रारब्ध. अन्याय, अत्याचार, अज्ञान, लाचारी, गुलामगिरी, भूक, दारिद्र्य, अवहेलना, अपमान या सर्व समस्यांचे प्रचंड ओझे एकाच वेळी डोक्यावर घेऊन जीवन कंठणाऱ्या दलितांना पदोपदी वेदनामय जीवन जगण्याची वेळ आल्याचे दिसून येते.

शतकानुशतकांपासून हिंदू धर्माने समाजव्यवस्थेने शूद्र व अस्पृश्य दलितांवर सर्वकषपणे विषमता लादून त्यांच्याकडून माणुसकीचा मूलभूत हक्क हिरावून घेतला. दलितांना पशूंपेक्षाही खालच्या पातळीचे जीवन कायमस्वरूपी जगण्यास भाग पाडले. हा सवर्णांचा दलितांशी असलेला व्यवहार द्रोहाचाच होता. याचे चित्रण योगेंद्र मेश्राम यांनी 'माझा गाव कुठाय' ? या कादंबरीतून केलेचे आढळते. दलितांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारून त्यांना कायम गुलामगिरीचे जीवन जगण्यास भाग पाडणारा धर्म, समाज, संस्कृती यांचा दलित अस्पृश्यांशी असलेला व्यवहार हा अमानवी होता. इतिहासाने, धर्माने, देशाने, संस्कृतीने दलितांशी केलेला हा विद्रोहच होता.

जे जे प्रस्थापित, विषम, कुरूप, पारंपरिक असेल त्यास नकार देणे आवश्यक ठरले. हिंदू धर्म, वैदिक परंपरा, इतिहास, संस्कृती, कर्मकांड, जातीयता या सगळ्या बाबींनी दलितांचे सातत्याने सर्वांगीण शोषण केले. या सगळ्या गोष्टींना फुले - आंबेडकरांनी नाकारले. मानवतेला कुरुप व कलंकित करणाऱ्या या परंपरेतल्या गोष्टींना दलितांनी नाकारले. १९५६ मध्ये आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. आंबेडकरांनी त्यातील हिंदू धर्म, कर्मकांड, दैवत, उपासतापास नाकारल्याची घोषणा केली. या घोषणाच त्यांच्या 'बावीस प्रतिज्ञा' म्हणजे नकाराचे तत्वज्ञानच होय.

संघर्ष हा दलित कादंबरीतील महत्वाचा मुद्दा आहे. दलित माणसाला जीवन जगण्यासाठी अनेक बाबतीत संघर्ष करावा लागला. भूक, दारिद्र्य, विषम समाजव्यवस्था, अन्याय, अत्याचार सोसण्याबरोबरच जीवन जगण्यासाठीसुद्धा त्यांना संघर्ष करावा लागतो. अण्णाभाऊंच्या 'फकिरा' मध्ये माणूस म्हणून जगण्यासाठी लागणाऱ्या भाकरतुकड्याचा संघर्ष आहे. भीमसेन देठे यांनी 'इस्कोट'मधून माणुसकीचा संघर्ष ठळकपणे मांडला आहे. 'झोपडपट्टी' या कादंबरीतून आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठीचा संघर्ष शंकरराव खरात यांनी प्रभावीपणे चित्रित केला आहे.

'दलित कादंबरीचे स्वरूप' खालील कादंबरीच्या सहाय्याने मांडलेले आहे.

शंकरराव खरातांच्या 'मी माझ्या गावाच्या शोधात' व 'झोपडपट्टी' या कादंबऱ्यांमधून गावकुसाबाहेरील दलित समाजाच्या दारिद्र्याचे चित्रण व सवर्णांविरूद्ध दलित असा जातीय संघर्ष आहे. सवर्ण रूढीग्रस्त परंपरेला, हिंदू संस्कृतीला चिकटलेले आहेत. या कादंबरीतील नायक आनंदा हा सुशिक्षित इंजिनियर आहे. गरीब कुटुंबात जन्मलेला असल्याने तो जिद्दीने शिकून आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करतो. घरात अठराविश्व दारिद्र्य असल्याने आई-वडील शेतमजुरी करतात. त्या मजुरीवरच त्यांना आपला चरितार्थ चालवावा लागतो. घरात लहान भावंडे असतात. त्यांनाही गरिबीमुळे पोटभर खायला मिळत नाही. त्यावेळी आनंदा म्हणतो, 'आई – बापांची लाचारी, दुबळा संसार, गाडग्या मडक्यांच्या अन चार भांड्या-बासणांच्या घरातल्या भांड्याकुंड्यांतून, फाटक्या कपड्याचिंध्यातून दारिद्र्य ऑ वासून बघत होते. सगळ्या घरादाराला गिळायला ते आपला जबडा आ ऽऽ वासून कायमच उंबऱ्यात बसलेलं होत.[३२] (पृ. ६) अशा परिस्थितीत तो शिक्षण घेऊन गावात येतो. गावकऱ्यांविषयी त्याला अत्यंत आदर असून, ज्यांनी स्वत: उपाशी राहून आनंदला शिक्षण दिले त्या आईवडिलांवरही त्याची निस्सीम भक्ती आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या गावकऱ्यांसाठी आणि आपल्या जात बांधवांसाठी करावा या हेतूने तो गावात येतो पण गावातील रुढी, परंपरा, संघर्ष पाहून त्याला धक्काच बसतो. इंजिनियर झाला असला तरी त्याच्याकडे 'महाराचा मुलगा' म्हणूनच पाहिले जाते. आपण एवढे शिक्षण घेतले तरी आपल्याशी गावकऱ्यांचे वर्तन पक्षपाती जातीयवादाचे आहे याचे आनंदला दु:ख होते.

आनंदने गरिबीतून शिक्षण घेतले असल्याने तो मुळातच अत्यंत हुशार असल्याने निर्भीड, स्वाभिमानी, करारी बनला होता. स्वत:चे शिक्षण पूर्ण करीत असताना त्याला ज्या परिस्थितीतून जावे लागले, ती अत्यंत विदारक होती मी बी.इ. सिव्हीलची परीक्षा पास झालो. मला माझं ध्येय गाठतांना कितीतरी अडचणींना तोंड दयावं लागलं, माझ्या ध्येयांची वाट काट्याकुट्यांची होती. ही वाटचाल करताना वाटेत मला काटे बोचले. धोंड्या - दगडांत ठेचकाळलेला खाचखळग्यात पडलो. हातापायाला लागले, जखमा झाल्या,

जिव्हारी वेदना ठणकत होत्या पण मी वाट सोडली नाही. तसाच अंधारातून, काळोखातून मी प्रकाशकिरणांचा, प्रकाशाचा शोध घेत होतो.[३३] हे आनंदाचे मनोगत प्रांजळ व प्रत्ययी आहे. आनंदा आंबेडकरांच्या विचारांनी भारलेला असल्याने तो सवर्णांविरुद्ध संघर्ष करण्यास तयार होतो. हिंदू समाज, परंपरा, रुढी ही त्याला विशाल कैदखाना आणि हा दलित समाज जणू कैदी वाटतात. याविरुद्ध तो बंड करून उठतो.

'झोपडपट्टी' या कादंबरीत झोपडपट्टीवासीयही आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करताना दिसतात. या कादंबरीतील पोस्टमास्तर आंबेडकरी विचारांचा असल्याने झोपडपट्टीत राहणाऱ्या सामान्य लोकांत जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न करतो. एकदा सकाळच्या वेळी कामधंद्याच्या आशेनं धक्याच्या चौकात गबरु, झांब्या, लक्ष्या येऊन बसले होते. कामाच्या वर्दीची काहीच आशा दिसत नसल्याने त्यांच्या पोटाचे हाल चालले होते. तेव्हा पोस्टमास्तर सगळ्यांना म्हणतात, अरे, जर तुमचे पोटापाण्याचे हाल चाललेत तर मग तुम्ही मेलेल्या मढ्यासारखं गप्प कसं ? एवढं करून तुमच्या हृदयात संतापाचा, चिडीचा डोंब, आग कशी पेटत नाही? यावर गबरु म्हणतो, ''मास्तर, आमच्या मनात या गोष्टीची आग पेटलीय ! पण ती तुम्हाला कशी दावावी ? मास्तर म्हणतात, यासाठीच गबरु संपत्तीची गंगा गोरगरिबांच्या दारी आणली पाहिजे. माणसाच्या पोटातल्या भुकेच्या आगीनेच, तुंबलेल्या संपत्तीचे बांध फोडले आहेत. आता तुम्हीच विचार करा असे मास्तर म्हणतात आणि "आम्ही आमची मुले भुकेने मारणार नाही"[३४] असा निश्चय झोपडपट्टीतील माणसे करतात. अशा तऱ्हेने झोपडपट्टीवासीयांच्या मनात समाजपरिवर्तनाची ज्योत पोस्टमास्तर निर्माण करतात.

अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी मातंग गुन्हेगार जमातीची दाहक जीवनगाथा आहे. फकिराच्या लहानपणी त्याच्या बापाचा खून शिगावचा बापू खोत करतो. फकिराची आई राधा आपल्या पतीच्या मृत्यूचा बदला मनामध्ये ठेवूनच फकिराला वाढवते. फकिरा लहानाचा मोठा होत असताना आपल्या समाजातील लोकांची अवस्था जवळून

पाहतो व बेचैन होतो. या जीवघेण्या सामाजिक होरपळीने त्याचे रक्त सळसळत असते. त्यामुळेच बंड करून न्याय मिळवण्याचा प्रयत्न तो करत असतो. वाटेगावात तापसरीने अनेक माणसे मरू लागली तेव्हा फकिराने जीवाचे रान करुन जी माणसे जिवंत होती त्यांची औषधपाण्याची सोय केली. प्रेतांची वासलात लावण्यात तो जातीभेद विसरून गुरफटून गेला. पुढे गावात दुष्काळ पडला तेव्हा फकिरा मांगवाड्याला जगविण्याची जबाबदारी स्विकारतो. विष्णुपंत कुलकर्णी यांचा 'काहीही करा पण जगा' हा मूलमंत्र स्विकारून लूटमार करण्यासाठी सज्ज होतो.

भेडसगावच्या सरकारी खजिन्यावर फकिरा दरोडा घालतो. ते विषम अर्थव्यवस्थेत चिरडल्या गेलेल्यांचे हात मजबूत करण्यासाठी. खजिन्याचा रखवालदार रघूबामण निकराने प्रतिकार करतो. शेवटी त्याचा नाईलाज होतो. रघुबामणाची बायको आणि मुली अंगावरील दागिने उतरून फकिरापुढे ठेवतात, तेव्हा रघुबामणाची बायको म्हणते, ''बाबा, हा वाडा धुवून घेऊन जा परंतु ह्या दोन मुलींची लग्ने झालेली नाहीत. मी पदर पसरून भीक मागते" तिचे हे शब्द ऐकून फकिराला भडभडून येते. तो म्हणतो, "आई, थांबा मी खजिना न्हेणार न्हाय, तुमास्नी ओरबडाय मी आलो न्हाय, कारण कुणाची अब्रू खाऊन उपाशी माणस जगत नसत्यात.[३५] फकिरा गुन्हेगार जमातीतील म्हणून केवळ लूटमार करण्यासाठी गेला नव्हता, तर गावच्या अन्नान्नदशेला बुजवून टाकण्यासाठी तो गेला होता. परिस्थितीला शरण न जाता त्यातून वाट काढण्यात त्याने जे धैर्य दाखविले, ते दुसरे कोणीही दाखवू शकणार नाही आणि त्याला गुन्हेगारही म्हणता येणार नाही. आपल्या जीवाची काहीही पर्वा न करता शेवटपर्यंत तो आपल्या जातबांधवांसाठीच लढला.

यातूनच उपेक्षितांच्या अंतरंगातील आगडोंब आपल्याला पहायला मिळतो. फकिराच्या अंगातील हिंमत, निराशेची भेसूरता आणि त्यातून उत्पन्न झालेले क्रौय, तसेच स्वत्व जपण्यासाठी पिसाळून जाऊन समोरच्या विरोधकाच्या सामर्थ्याची तमा न बाळगता अखेरच्या क्षणापर्यंत झुंज देणारा फकिरा आपल्याला दिसून येतो.

'मेलेलं पाणी' या कादंबरीत ढोरवस्तीचे तपशीलाने चित्रण येते. "एखादा मनुष्य वाकूनच जाऊ शकेलं इतपत उंच चौकट असलेली कित्येक घरांची दारे ढासळलेल्या मानवतेसारखी कित्येक ठिकाणी वाकली होती. घरांची कौले काळी लाल अशी मिश्र रंगाची होती. घरांची, कौलांची शाकारणी न झाल्यामुळे कौलावर 'हराळी' व 'शंकरुबा'झुडपे वाढली होती. भिंती लाल मातीने बांधून काढल्यामुळे दोनचार पावसाळ्यांतच भिंतीवरचा मातीचा लेप उडून गेला होता. आतल्या विटा आणि वेडेवाकडे दगड उघडे पडले होते. कोणतेही घर बांधताना रस्ता, गटार, पायवाट यांचा अजिबात विचार केला नव्हता. त्यामुळे डोंगराच्या उतारावर पसरलेल्या दगडधोंड्यांसारखी ती घरे वाटत होती.[३६] यावरून असे दिसून येते की दलित समाजातील दारिद्र्य एवढे भीषण होते की त्यांना पोट भरण्यासाठी मोलमजुरी करावी लागत असल्याने आपल्या राहत्या निवाऱ्याकडे लक्ष द्यायलाही त्यांना वेळ नाही. यातून त्यांच्या दारिद्र्याची जाणीव होते.

गावकुसाबाहेरील दलित समाजही इतर समाजासांरखाच अंधश्रद्धाळू आणि परंपरेला चिकटून असलेला दिसून येतो. ढोरवाड्यात मठ असल्याने मठात विठ्ठल रखुमाईची मूर्ती असते. त्याच्या शेजारी एक भले मोठे शिवलिंग असते. मठात श्रीधरस्वामींच्या पांडवप्रतापाचे वाचन चालले होते. ते ऐकत असताना यल्लाप्पा परसूला म्हणतो, ''देवास्नीबी वनवास चुकला न्हायी. तीतं आमासारख्यांचं काय हाल असतील, तेला गनती हाय का ? आमीतरी कसली माणसं,[३७] या संवादावरुन असे दिसून येते की गावकुसाबाहेरील व्यक्तिअजूनही अंधश्रद्धेला बळी पडताना दिसतात.

'इस्कोट' मधील दामू महाराचे घरही असेच आहे. दामूचं घर म्हणजे माती दगडांच्या चार भिंती. त्यांचीही पडझड झालेली, त्यावर कित्येक वर्षाचे जुनाट वासे. त्यांच्यावर खिळ्यांनी ठोकलेले पत्रे. पत्र्यांना कित्येक ठिकाणी भोकं पडलेली. घरात उन्हाळ्यात अंगाची लाहीलाही व्हायची, तर पावसाळ्यात ते जागोजागी गळायचे. वादळ वारा सुरू झाला की धडगतच नसायची. त्यांचा धाड ऽऽ धाड असा मोठ्याने आवाज व्हायचा.

पत्र्यांवर मोठमोठाले दगड ठेवले. होते कधी कधी ते घरंगळत खाली कोसळायचे. कधी एखाद दुसरा पत्रा वाऱ्याच्या जोराने उडून जायचा. त्या पत्र्यांच्या होणाऱ्या आवाजाने सखू व दामू घाबरून जायचे. संकटाची चाहूल लागल्यावर चिमणी जशी आपल्या पिल्लांना पंखांखाली घेऊन बसते, तशी वादळाने घाबरलेली सखू आपल्या पोरांना उरापोटाशी धरायची. ते डळमळित घर कधी कोसळेल याचा भरंवसा नव्हता.[३८]

'निवारा' ही माणसाची खरी गरज असते. ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण होण्यासाठी माणसाला घर आवश्यक असते पण हे घर यापासून संरक्षण करताना दिसत नाही. उलट त्यापासून जास्तच त्रास होताना दिसतो. यातून दामूचे दारिद्र्य अधिक गडद होताना दिसते. जातीय प्रवृत्तीच्या सवर्णांना दलितांच्यात झालेले परिवर्तन व सुधारणा नको असते. दलितांनी दलितांसारखेच जीवन जगावे अशी सवर्णांची मानसिकता असते. या कादंबरीतील महार समाजाने बौद्ध धर्म स्विकारल्यामुळे सवर्ण समाज दलितांचा कामधंदा बंद करून टाकतात. तेव्हा सुंदरा म्हणते, ''बुद्ध झाल्यापास्नं सारा गावच आपला राग राग करतोय. बुद्ध व्हऊन आपण काय त्यांच्या बापाचं घ्वाडं मारलय ? त्ये काय बी समजत नाय ! आपली बटाटं निवडण्याची, खुरपणी येटाळणी, शेंगा तोडायची सारीच काम या गावानं बंद करून टाकलीत."[३९] यातून दलित व सवर्णातील संघर्ष दिसून येतो. त्याबरोबरच दलितांनी परंपरेने आखून दिलेल्या चाकोरीतूनच जीवन जगावे अशी सवर्ण समाजाची भूमिका स्पष्ट होते.

'अजून उजडायचं आहे' या कादंबरीतील चांभार जातीतील देवजीच्या पाचवीलाच दारिद्र्य पुजलेले होते. तो राबराब राबूनही त्या कामाचा मोबदला कोणी व्यवस्थित देत नव्हते. त्यातून त्याच्या कुटुंबाचा साधा पोटाचाही प्रश्न सुटत नव्हता, त्यामुळे त्याच्या कुटुंबाची उपासमार होत होती. ''देवजी व त्याच्या कुटुंबाला कधी गोडधोड खायला मिळालं नव्हतं, नेहमी कोंड्याची भाकरी आणि कण्यांची पेज खाऊन त्यांना कंटाळा येत असे. कधी कधी तर तीही मिळत नसे. मग कसल्याही भाजीवर त्यांना भूक भागवावी लागे,

तर कधी फक्त पाणी पिऊन झोपावे लागे.[४०] कादंबरीत आलेले हे देवजीच्या कुटुंबाचे चित्रण काळजाला चटका लावून जाते.

धंद्यात राबराब राबूनही आपली गरिबी हटत नाही याचे नवल देवजीला वाटते, तो मनाशीच म्हणतो सालं एवढं काम करतोय, मरमर मरतोय तरी आपलं दारिद्र्य नाहिसं होत नाही. बरं, आपल्याला काय व्यसन तरी आहे ? अगदी कधीतरी फारच कंटाळा आला, अंग दुखायला लागलं, तर ग्लासभर घ्यायची. नाहीतरी लोकं सकाळ - संध्याकाळ दारूत बुडालेले असतात. तसले तरी व्यसन आपल्याला नाही. साधे स्वत:च्या अंगावर कपडे घालायचे म्हटले तरी त्यासाठी पैसे उरत नाहीत. शेवटी कुणाकडूनतरी भीक मागूनच घालावे लागतात.[४१] बायको - मुलांच्या अंगावर कपडे घालायला मिळत नाहीत. देवजीने वाचलेला हा दारिद्र्याचा पाढा मन हेलावून सोडणारा आहे. गावकीच्या कामात त्याला फारसा मोबदला मिळत नाही, हे त्याचे दारिद्र्यच दाखवून देते. देवजीच्या आयुष्याला चिकटलेल्या दु:खाचे चित्रण करताना चांभार जातीचे दु:ख यातून व्यक्त होते. परंपरेच्या साखळीला बांधलेले जीवन देवजी व त्याचे कुटुंब जगत असते. परंपरेची साखळी तोडून जागण्याचे धाडस देवजीमध्ये नाही. म्हणूनच मिळेल त्या पैशात आपली गुजराण करून चरितार्थ चालविण्याचा देवजी प्रयत्न करतो.

'हाडकी हाडवळा' या कादंबरीमध्ये दलित समाजातील स्त्री असलेल्या बायजाच्या जीवनातील संघर्षाची ही कहाणी आहे. 'हाडकी हाडवळा' म्हणजे महारांना मिळालेली सामूहिक इनामी जमीन. या जमिनीवर महारांचाच अधिकार असतो. हाडकी हाडवळात राहणाऱ्या महारवाड्यातील प्रत्येक कुटुंबावर एक वर्षासाठी 'येसकरी काठी' येत असते पण या वर्षीची 'येसकरी काठी' बायजमाकडे आलेली असते तिचा पती नोकरीनिमित्त मुंबईत रहात असतो. त्यामुळेच बायजा आपला मुलगा सावळा व ज्याला लहानपणापासून आईच्या मायेने व पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळलेला धाकटा दिर मनबा सोबत ती राहत असते. मुलाला सांभाळण्याची, त्याच्या शिक्षणाची आणि पालनपोषणाची जबाबदारी बायजावरच

असते. त्यासाठी ढोर मेहनत करून प्रसंगी मीठमिरची खाऊन जीवन जगत असते. बायजा दिसायला सुंदर असल्यामुळे सवर्णीयाबरोबरच तिच्या जातीतील लोकांचीही नजर तिच्यावर असते पण बायजा स्वत: हिंमतवान असल्यामुळे तिला कोणी हात लावू शकत नाही. 'तारुण्यात पदार्पण केलेला व ज्याला स्वत:च्या मुलाप्रमाणे सांभाळला तो धाकटा दिर मनबा एक दिवस तिच्या अंगचटीला येतो. बायजाच्या मनाला हे पटत नाही. ती सैरभैर होते आणि मनबाचा सूड घेते. मनबा आपली यातून सुटका होणार नाही हे समजून महारडोह जवळ करतो. मनबाशी तिला अप्रत्यक्षपणे संघर्ष करावा लागतो . बायजा जेव्हा मनबाला पोटच्या मुलाप्रमाणे जपते तेव्हाचं तिच ते मायाळू रूप आणि मनबा तिच्या अंगचटीला येतो, तेव्हाचे तिचे रौद्र रुप केवढ भयंकर होते, याची जाणीव या प्रसंगातून होते.

वर्षभरातील गावकीच्या कामाची जबाबदारी पार पाडताना स्वत:चे घर सांभाळताना तिला अनेक तऱ्हेचे संघर्ष करावे लागतात. घरात शिजविण्यासाठी अन्न नव्हते, म्हणून ती पाटलाच्या शेतात शेंगा तोडायला जाते, तेव्हा राखणदाराशी झुंज होते. चुलत सासू पाटलाला बदडून काढते. या येणाऱ्या अडचणीमधून ती स्वत:ला सांभाळते. बायजावर ओढवलेल्या प्रसंगाने ती हताश होते आणि शेवटी म्हणते मुंबयत बी असाच म्हारुडा आसलं काय ? आन आसलाच तर त्यात असाच एखादा मनबा आसलं कायं ? 'हाडकी हाडवळा' मध्ये या सण आणि उत्सवाबरोबर एक वर्षाच्या कालावधीमध्ये महारांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खांचा, कडक जीवनयातनांचा फेरा कसा पूर्ण होतो, महारांच्या दु:खाचे वेगवेगळे स्तर बायजाच्या माध्यमातून, विशेष करून दलित स्त्रीच्या वाट्याला येणारे दु:ख किती भयाण असते, याचे चित्रण 'हाडकी हाडवळा' मधून चित्रित केले आहे.

'उपल्या' ही एक राजकीय कादंबरी आहे. या कादंबरीमधून लेखक 'शरणकुमार लिंबाळे' यांनी दलित चळवळीतील काही वृत्तींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर 'उपल्या' म्हणजे वानरांच्या टोळीचा नायक. आपले वर्चस्व टिकवण्यासाठी 'उपल्या' सारखी वृत्ती, सर्वसाधारणपणे सर्वच प्राण्यांमध्ये थोड्याफार फरकाने आढळून

येते. मनुष्यप्राणी स्वत:चे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी समोरच्या प्रतिस्पर्ध्याला बाजूला करून उच्च पदावर आपणच जाऊन बसतो. कारण, ज्या महान नेत्याने ही चळवळ सुरू केली, त्यामागील ध्येये, उद्दिष्टे वेगळी होती. स्वत:बरोबर इतर दलित बांधवांना बरोबर घेऊन सगळ्या दलित समाजाची प्रगती करावी, सर्व दलितांनी एकत्र यावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती. परंतु या महान नेत्याच्या निर्वाणानंतर दलित चळवळ आपणच चालवावी, तिचे नेतृत्व आपल्याकडे असावे, दलित चळवळींचा मीच खरा नेता आहे, असे समर्थन सुरू झाले. काहींनी आंबेडकरी चळवळच ताब्यात घेण्याचा प्रयत्न चालविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शाने भारावलेले सर्वजण दलित चळवळींमध्ये, सक्रिय कार्यकर्ते म्हणून सहभागी झाले. दलित चळवळीचा कार्यकर्ता हा पोटतिडकीने आपले काम करीत असतो. तो अन्यायाविरुद्ध पेटून उठतो, विद्रोह करतो. नामांतराच्या प्रश्नासाठी बलिदान करतो  पण हाच कार्यकर्ता, भविष्यात राजकीय नेता झाला की पूर्णपणे बदलतो. तो भ्रष्टाचारी होतो. राजकीय बाहुले बनतो. कोणतेही निर्णय स्वत: घेऊ शकत नाही. राजकीय यंत्रणेखाली दबला जातो. आपल्या समाजातील लोकांचे छोटे-मोठे प्रश्न तो सोडवू शकत नाही. आपल्याच दलित बांधवांची तो पिळवणूक करतो. बाबासाहेबांच्या जयंतीच्या नावाखाली पैसे गोळा करुन त्याच्याबरोबरचे अनेक  कार्यकर्ते आपला स्वार्थ साधून घेतात.

रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, नामांतर अशा टप्प्यांमधून पुढे सरसावणारी दलित चळवळ, रोहिदास, गौतम, मिलिंद अशा एकेकाळच्या दोस्तांमध्ये वाढत गेलेले मतभेद, त्यातून निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या संघटना यांचे चित्रण 'उपल्या' या कादंबरीतून प्रकट होते. रिपब्लिकन आणि कॉंग्रेसची युती होते  व रोहिदास नागदिवे हा खंदा दलित कार्यकर्ता मंत्री होतो. "रोहिदासचे मित्र वेगवेगळ्या 'पार्ट्यांना' घेऊन त्याला भेटू लागतात. कुणाला बदली हवी असते. कुणाला बीअरबारचा परवाना हवा असतो. कामासाठी काहीही पुरवायची तयारी असते."[४२] एके काळचे चळवळीतले कार्यकर्ते झटपट पैसे मिळविण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात आणि चळवळ संपल्यात जमा होते. चळवळ पुन्हा जोमाने

उभी करण्याची इच्छा कोणातच रहात नाही. निवडणुका जाहीर होतात. रोहिदासचे मंत्रीपद संपुष्टात येते आणि डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणदिनी, दर्शनासाठी चैत्यभूमीवर गेलेल्या रोहिदासला, चंद्रकांत आंभोरे या दलित नेत्याचे कार्यकर्ते धक्काबुक्की करतात व त्याचे कपडेही फाडतात. या प्रसंगातून माणसामध्येही प्राण्यांमधील 'उपल्या' ची वृत्ती दिसून येते.

त्याप्रमाणेच 'हिंदू' कादंबरीमध्येही दलितांवर होणारा अन्याय, अत्याचार आणि यातून निर्माण होणारी दलित चळवळ यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न लेखक शरणकुमार लिंबाळेंनी केला आहे. हिंदू धर्म आणि समाजातील विषमतेचा चेहरा धारण केलेली ही कादंबरी आहे. एकिकडे उग्र हिंदुत्वाची लाट आणि दुसरीकडे त्याविरुद्ध संघटित होणारी दलितांमधील आत्मसन्मानाची जाणीव ही तात्या कांबळेंच्या 'आंबेडकरी जलशांमधून दिसून येते. त्यांच्या जलशामुळे अचलपूरला नवीन नाव मिळालं होतं. 'जलसाकार' तात्या कांबळेचं गाव म्हणून अचलपूरची ओळख वाढत होती पण एका महाराच्या नावानं गाव ओळखण्यात याव अशी सवर्णांची भूमिका नव्हती. त्यासाठी त्यांनी दलितांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. सवर्णांच्या मनात दलितांविषयी असंतोष माजला होता. किड्यामुंगीसारखी क्षुद्रं जीवन जगणारी माणसं फुत्कारत होती. आंबेडकरी जलशाद्वारे आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी दलित समाज एकत्र येत होता. दलितांनी गावकीची कामे नाकारली होती. त्यामुळे सवर्णांचा अहंकार दुखावला होता.

दलितांच्या स्वाभिमानाने सवर्णांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. त्यांनी आपली सेवाचाकरी करावी, आम्ही देऊ ते घेऊन धन्यता मानावी अशी सवर्णांची भूमिका होती पण दलितांनी या व्यवस्थेला नाकारलं होतं. आपला धर्म बदलला होता. बौद्ध धर्म स्विकारून ह्या व्यवस्थेला झिडकारलं होतं. त्याचीच सुरुवात म्हणून धम्मचक्र परिवर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात दलित समाजसेवक तात्या कांबळे यांच्या भाषणात आक्रमकता होती. "जो धर्म तुम्हाला देवळात जाऊ देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता ?

ज्या धर्मात अमंगल पशूचा स्पर्श झाला तरी तो चालतो पण माणसाचा स्पर्श चालत नाही, तो धर्म नसून वेडगळपणा आहे. तात्या कांबळेचं भाषण ज्वालामुखीसारखं वाटत होत."[४३] भाषण संपलं आणि गावातील सुरेश चव्हाण, शंकर पुजारी, रवि मोरे या सवर्ण मंडळीनी तात्या कांबळेंना आपल्याबरोबर गावात नेऊन त्यांचा खून केला आणि दलित समाज एका धडाडीच्या कार्यकर्त्याला, जलसाकाराला कायमचा मुकला.

तात्या कांबळेचा लहान भाऊ सदानंद हा माणिकचंद व गोपीचंद यांच्या फार्म हाऊसवर वॉचमन होता. त्याला स्वत:च्या भावाचा खून झाल्याचेही माहित नव्हते. तात्या कांबळेच्या हत्येनंतर सवर्णांच्या जमावाने दलितांच्या झोपड्या जाळल्याने सदानंदबरोबर त्याचे सर्व कुटुंब फार्महाऊसवर राहतं होते. माणिकचंद आणि गोपीचंद सदानंद कांबळेला थारा देतात याची गाववाल्यांना चीड होती. यातूनच गाववाल्यांनी त्यांच्या गाडीच्या काचा फोडून आपला संताप व्यक्त केला. प्राणघातक हल्ला झाल्याची बातमी वर्तमानपत्रात छापून आल्याने माणिकचंद आणि गोपीचंदभोवती वलय निर्माण झाले. दलितांचे कैवारी म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली होती. सदानंद कांबळेला आश्रय दिल्याचे श्रेय त्यांना मिळाले होते. याचा फायदा घेऊन दलितांना त्यांनी चळवळ करण्यास भाग पाडले. चळवळीच भांडवल करून, लोकांच्या प्रश्नांकडे स्वत:ची तुंबडी भरून घेण्याचं साधन म्हणून पाहणाऱ्या माणिकचंद व गोपीचंद या दोन लुटारू प्रवृत्ती आहेत, तर तडजोडी करणारा, स्वार्थाने बरबटलेला, भावाच्या खुनाची वाचा न फोडणारा सदानंदही दलित समाजात आहे. त्याचप्रमाणे डोळ्यांत तेल घालून जागणारे, समाजासाठी अहोरात्र झटणारे, तात्या कांबळे, काशिनाथ पोळके, रमा बाबर, राहूल बनसोडे यांसारखे सामाजिक कार्यकर्तेही समाजाला लाभलेले आहेत. प्रभाकरच्या मृत्यूमुळे दलित कार्यकर्त्यांनी वैमनस्य विसरून मदतीचा हात पुढे केला होता. दलित कार्यकर्त्यांची माणुसकी पाहून प्रभाकरचा भाऊ मधुकर कावळे गदगदून गेला.

समाजातील विषमता आणि विकृत जातीयतेचा कलंक किती काळाकुट्ट आहे याची प्रचिती आणून देणारी 'हिंदू' ही कादंबरी आहे. वासना आणि विद्रोह य सरमिसळीतून या कादंबरीचे रूप प्रकट झाले आहे. दलितामधल्या दुफळीचे, चळवळींच्य आश्रयाने वाढणाऱ्या चंगळवादाचे, न्याय अन्यायाचे विदायक चित्र रेखाटणारी ही कादंबर म्हणजे दलितांच्या राजकीय हक्कांची कैफियत आहे.

आतापर्यंत आपण या प्रकरणात दलित कादंबरीच्या स्वरूपाचा अभ्यास करतान दलित साहित्याविषयी अनेक समीक्षकांच्या मतांचा आढावा घेतला. १९६० नंतर मराठ साहित्यात दलित कादंबरी लेखनाचा उदय झालेला दिसून येतो. दलित कादंबरी अनेक अंगांनी समृद्ध झाल्याने या कादंबरीने मानवी जीवनाचे अलक्षित रूप समृद्ध केले आहे.

**निष्कर्ष :**

१) दलित साहित्य हा एक महत्वाचा वाङ्मयप्रवाह असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून या साहित्याची निर्मिती झाली आहे.

२) दलित कादंबरी प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच आविष्कार करत असून सामाजिक बदलांबरोबरच दलित कादंबरीतही बदल घडून आलेला आहे.

३) दलित कादंबरी ही आंबेडकरी तत्वज्ञानावर आधारित असल्याने दैववाद व रुढीवाद यांचे उच्चाटन दलित कादंबरीतून झाल्याचे दिसून येते.

४) मराठी कादंबरीपेक्षा दलित कादंबरी दलित समूहजीवनाची संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकीचे तत्व जपते.

५) कविता वा कथेप्रमाणे दलित कादंबरीला हवी तशी गती अजूनही प्राप्त झाली नसली तरी दलित कादंबरी वेदना, विद्रोह, नकार या तीन पातळ्यांवर आविष्कृत झालेली आहे.

६) दलित कादंबरीच्या निराळेपणातून दलित कादंबरी आपला वेगळा ठसा उमटविताना आशयाचे एक अविभाज्य अंग म्हणून रुपक, प्रतिक व प्रतिमांचा वापर करते.

७) दलित कादंबरी ही व्यक्ती व समाज चित्रणाचे वर्णन करताना कादंबरीचा आशय प्रभावी होण्यासाठी निवेदनाच्या भाषेतून सौंदर्यनिर्मिती व्हावी व पात्रांची भाषा भारदस्त असावी यासाठी भाषा, रुढी, संकेतांना फाटा देऊन बोलीभाषेचा वापर करते.

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) | बापट प.वा, गोडबोले ना.वा. | 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास' व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती १९७३ पृ.३७. |
| २) | हस्तक उषा | कादंबरी आणि मराठी कादंबरी साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९३ पृ. २८. |
| ३) | भालचंद्र नेमाडे | 'टिकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद आवृत्ती पहिली, १९९० पृ. १९८. |
| ४) | किरवले कृष्णा | समग्र लेखक : बाबुराव बागूल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००२ पृ. २१. |
| ५) | तत्रैव | पृ. २३. |
| ६) | बागूल बाबुराव | 'जेव्हा मी जात चोरली होती'. अभिनव प्रकाशन, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९८४ पृ. १५०. |
| ७) | डांगळे अर्जुन | 'दलित साहित्य : एक अभ्यास' म.रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७७ पृ. ४१ |
| ८) | मनोहर यशवंत | 'दलित साहित्य : सिद्धांत व स्वरुप' प्रबोधन प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, १९७८ पृ. १. |
| ९) | वानखेडे म.ना. | 'अध्यक्षीय भाषण, दलित साहित्य संमेलन', नागपूर, १९७६. |
| १०) | मांडे प्रभाकर | 'दलित साहित्याचे निराळेपण' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती १९८७ पृ. २१. |
| ११) | भगत दत्ता भगत | 'दिशा आणि दिशांतर' अभय प्रकाशन, नांदेड प्रथम आवृत्ती, १९९२ पृ. ३७. |

| | | |
|---|---|---|
| १२) | ढसाळ नामदेव | 'दलित पँथर भूमिका', 'आम्ही दिवाळी' अंक १९७३ पृ. ७८. |
| १३) | मेश्राम केशव | 'लोकराज्य' अंक, मुंबई जाने. १९७९ पृ. २४. |
| १४) | मेश्राम योगेंद्र | 'आम्ही दिवाळी' अंक, मुंबई, १९७३ पृ.७८. |
| १५) | पळशीकर वसंत | 'समाजप्रबोधन पत्रिका' जाने. फेब्रु. १९७० पृ. २८. |
| १६) | गणवीर रत्नाकर | 'विलायतेहून' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. १३. |
| १७) | खरात शंकरराव | 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' इनामदार बंधू प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९७८ पृ. ४२. |
| १८) | फडके भालचंद्र | 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह' श्री विद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, नोव्हेंबर २०००, पृ. ४३. |
| १९) | सरदेशमुख त्र्यं.वि. | 'अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९७७. |
| २०) | जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री | 'अस्मितादर्श' दिवाळी अंक १९७३ पृ. ७५. |
| २१) | बागूल बाबुराव | 'समाजप्रबोधन' पत्रिका मार्च - एप्रिल १९७१. |
| २२) | खरात शंकरराव | 'दलित वाङ्.मय प्रेरणा व प्रवृत्ती', इनामदान बंधू प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७८, पृ. १८. |
| २३) | पानतावणे गंगाधर | 'दलित साहित्य - चर्चा आणि चिंतन' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९३, पृ. ४२. |
| २४) | वि.स. जोग | 'मार्क्सवाद आणि दलित साहित्य' संबोधिनी प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती १९८५ पृ. १४. |

| | | |
|---|---|---|
| २५) | मांडे प्रभाकर | ‘दलित साहित्याचे निराळेपण साकेत प्रकाशन, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती १९८७ पृ. २१. |
| २६) | भगत दत्ता | ‘दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर’ अभय प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती, १९९२, पृ. ४६. |
| २७) | मेश्राम नंदा | ‘दलित कादंबरीचे स्वरुप’ डिंपल पब्लिकेशन, प्रथमावृत्ती, २००६, पृ. १४, १५,१६ |
| २८) | खरात प्रकाश | ‘दलित कथा : उगम आणि विकास’, सुगावा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९९२, पृ. २१. |
| २९) | डोळस वसंत | ‘दलित साहित्य : प्रेरणा व स्वरुप’ दिलीपराज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९९२ पृ. ७६. |
| ३०) | फडके भालचंद्र | ‘दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह’ श्री विद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९७७ पृ. २१०. |
| ३१) | गजभिये अनिल | दलित साहित्य : विचार आणि वैभव, अहिल्या प्रकाशन, इंदूर, प्रथमावृत्ती, १९९१ पृ. ३५. |
| ३२) | खरात शंकरराव | ‘मी माझ्या गावाच्या शोधात’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८३ पृ. ८. |
| ३३) | तत्रैव | पृ. ५. |
| ३४) | खरात शंकरराव | ‘झोपडपट्टी’, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७३ पृ. १३२. |
| ३५) | साठे अण्णाभाऊ | ‘फकिरा, सुरेश एजन्सी, पुणे दहावी आवृत्ती, १९८४ पृ. १६२. |
| ३६) | व्हटकर अशोक | मेलेल पाणी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती, १९८२ पृ. १०. |
| ३७) | तत्रैव | पृ. १६. |

| | | |
|---|---|---|
| ३८) | देठे भिमसेन | इस्कोट, प्रिया प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९९४ पृ. ५८. |
| ३९) | तत्रैव | पृ. १८. |
| ४०) | कोंडविलकर माधव | 'अजून उजाडायच आहे' पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती, १९९४ पृ. ५६. |
| ४१) | तत्रैव | पृ. ९, १०. |
| ४२) | लिंबाळे शरणकुमार | 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती, १९९८ पृ. १५४. |
| ४३) | लिंबाळे शरणकुमार | 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००३ पृ. ६०. |